सोलापूर तरुण भारत


Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर गुरूवार, २० फेब्रुवारी २०२५ वर्ष दुसरे अंक ३२६ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# मुंबई क्रिकेट संघाचे माजी कर्णधार मिलिंद रेगे यांचे निधन



मुंबई , १९ फेब्रुवारी : मुंबईचे माजी कर्णधार मिलिंद रेगे यांचे ७६ व्या वर्षी बुधवारी (दि. १९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मिलिंद माणिक रेगे हे मुंबई रणजी संघाचे माजी अष्टपैलू खेळाडू होते.

गेल्या आठवड्यात १६ फेब्रुवारी रोजी मिलिंद रेगे यांनी त्यांचा ७६ वा वाढदिवस साजरा केला आणि त्यानंतर काही दिवसांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आता त्यांच्या कुटुंबात पत्नी आणि दोन मुलं आहेत.अहवालानुसार, त्यांच्या किडनीनंही काम करणं थांबवलं होतं.

मिलिंद रेगे यांचं देशांतर्गत क्रिकेटमधील एक मोठे नाव होते.त्यांच्या निधनावर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर, सुनिल गावस्कर, मुंबई क्रिकेटचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, रवी शास्त्री यांनी दु:ख व्यक्त केलं आहे. मिलिंद रेगे यांचा जन्म १६ फेब्रुवारी १९४९ ला झाला. त्यांना ११६७-६८ ते १९७७-७८ या कालावधीदरम्यान मुंबई क्रिकेट संघाकडून खेळण्याची संधी मिळाली.

मुंबई संघाचं प्रतिनिधित्व केल्यानंतर त्यांनी निवड समिती अध्यक्ष म्हणून देखील भूमिका बजावली. मिलिंद रेगे हे वानखेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या प्रथम श्रेणी सामन्यातील मुंबई संघातील हयात असलेल्या ८ खेळाडूंपैकी एक होते. मिलिंद रेगें एक उत्कृष्ठ अष्टपैलू खेळाडू होते.

# 'छत्रपतीचे १२ किल्ले लवकरच जागतिक वारसा केंद्र होणार'- मुख्यमंत्री फडणवीस

पुणे : छत्रपती शिवरायांनी अठरापगड जातीच्या सामान्य मावळ्यांना एकत्र करत देव, देश, धर्म व रयतेचे राज्य स्थापन करण्यासाठी लढण्याची प्रेरणा दिली, त्यामुळे लाखोंची फौज घेऊन येणाऱ्या मुघलांनाही केवळ पाच हजार मावळे परास्त करायचे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या प्रमुख उपस्थितीत 'जय शिवाजी-जय भारत' पदयात्रेचा शुभारंभ पुणे येथे झाला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाच्या शुभेच्छा देत उपस्थितांना संबोधित केले.



यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव केवळ भारतामध्ये नाही तर जगातील २० देशांमध्ये साजरा केला जातो. ज्यावेळी भारतातील अनेक मोठे राजे मुघलांचे मांडलिकत्व स्वीकारून त्यांच्यासोबत काम करत होते, अशा परिस्थितीमध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब यांनी छत्रपती शिवरायांना मराठी मुलखाला व हिंदुस्थानला स्वतंत्र करायचे आहे, अशी शिकवण दिली.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे १२ किल्ले लवकरच जागतिक वारसा केंद्र होणार आहेत. राज्यकर्ते म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्माण केलेली करांची रचना, शेतकरी हिताची कामे, जल, जंगल संवर्धन, अभेद्य तटबंदी, आरमार, समुद्रकिनाऱ्यांचे व्यवस्थापन, समुद्री सुरक्षा अशी प्रत्येक बाब महाराजांनी आपल्याला शिकविली. सामान्य माणूस, महिलांचे कल्याण, सन्मान यांचा विचार छत्रपती शिवाजी महाराजांनी मांडला. त्यांचाच आदर्श घेऊन आम्ही वाटचाल करत आहोत. एक मजबूत भारत, बलशाली भारत निर्माण करण्यासाठी 'जय शिवाजी-जय भारत' ही पदयात्रा आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.यावेळी केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडविया, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय मंत्री रक्षा खडसे, खा. मेधा कुलकर्णी, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री आशिष शेलार, मंत्री दत्तामामा भरणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पंतप्रधानांकडून छत्रपतींना मानाचा मुजरा

नवी दिल्ली, १९ फेब्रुवारी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शिवाजी महाराजांना अभिवादन केले आहे. त्यांनी ट्विटरवर (एक्स) एक व्हिडीओ शेअर करत शिवरायांना अभिवादन केले आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आज, बुधवारी राज्यासह देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण देशभरात उत्साह व आनंदाचे वातावरण आहे. यापार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विटरवर एक व्हिडीओ शेअर करत महाराजांना अभिवादन केले आहे. या व्हिडीओ सोबत जारी केलेल्या संदेशात पंतप्रधान म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना अभिवादन करतो. त्यांच्या पराक्रमाने आणि दूरदर्शी नेतृत्वाने स्वराज्याची पायाभरणी केली, ज्यामुळे अनेक पिढ्यांना धैर्य आणि न्यायाची मूल्ये जपण्याची प्रेरणा मिळाली. ते आपल्याला एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा देत असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या संदेशात नमूद केले आहे.

# स्वराज्याची स्फुर्ती घेऊन महाराष्ट्र सेवा : मुख्यमंत्री

## शिव जयंतीला राज्य सरकारचा शिवनेरीवर दंडवत

पुणे, १९ फेब्रुवारी : शिवनेरी किल्ल्यावर आलो की, स्वराज्याची स्फुर्ती, तेज मिळते. हेच तेज आणि स्फुर्ती घेऊन आम्ही महाराष्ट्राची सेवा करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्ताने त्यांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर आयोजित जयंती समारंभात मुख्यमंत्री बोलत होते.

शिवनेरीवर आयोजित सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे माजी आमदार अतुल बेनके, बापूसाहेब पठारे,'विघ्नहर'चे अध्यक्ष सत्यशील शेरकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलिंद बारभाई,भाजप नेते आशाताई बुचके आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते शिवजन्माचा पाळणा जोजावण्यात आला. शिवजन्माचा



पाळणा जोजावण्यात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणेने संपूर्ण शिवनेरी दणाणून गेला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आपण ५ वर्षांनी छत्रपतींची ४०० वी जयंती साजरी करणार आहोत. शिवनेरी किल्ले व परिसरात विकासासंदर्भामध्ये आमदार शरद सोनवणे यांनी केलेल्या सर्व १३ मागण्या पूर्ण करण्यासाठी हे सरकार कटीबद्ध आहे. शिवनेरीवर आल्यावर इथली माती कपाळाला लावल्यावर स्वराज्याची स्फूर्ती मिळते. हीच स्फूर्ती उराशी बाळगून आम्ही राज्यकारभार करीत आहोत.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी पहिल्यांदा भारताचा आत्मभिमान जागवण्याचा काम केलं. आज १४० कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाचा आत्मभिमानामागे शिवाजी महाराज यांची प्रेरणा आहे. त्यामुळेच शिवाजी महाराज आमचे आराध्यदैवत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.शिवाजी राजांचे किल्ले मंदिरांसारखे आहेत. त्यांचे संवर्धन करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. त्यासाठी अनेक कामे सुरू केली आहेत. एक टास्क फोर्स स्थापन केली असून त्यातून किल्ल्यांवरील अतिक्रमणे हटवली जात आहेत.यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांवरची अतिक्रमणे हटवली जाणार असल्याची घोषणा देवेंद्र फडवणीस यांनी केली. याप्रसंगी महिलांनी पाळणा गीत म्हटले. जिल्हा परिषदेच्या काही शाळांनी यावेळी साहसी खेळाचे सादरीकरण केले. तसेच शिवनेरी भूषण पुरस्काराचे वितरण देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले.

# विधानसभेत एक झटका दिला आता मुंबई महापालिकेत दुसरा झटका देणार - शिंदे

मुंबई, १९ फेब्रुवारी : विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर शिवसेनेने आता महापालिका निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. उंच भरारी घेण्यासाठी गरुड (बाज) बनावे लागेल, धोकेबाज बनून चालणार नाही, आताच समुद्र पार केलाय, अजून अवकाश बाकी आहे अशा पंक्तींमधून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले. वरळीच्या एनएससीआय डोम सेंटरमध्ये आयोजित मुंबईतील शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, मागील अडीच वर्षात सरकारने मुंबई आणि राज्यात केलेली कामे जनतेपर्यंत घेऊन जा. प्रत्येक वॉर्डात शिवसेनेच्या शाखा आणि घर तिथे शिवसैनिक झाला पाहिजे. विधानसभेत एक झटका दिलाय आणि मुंबई महापालिकेत दुसरा झटका द्यायचा आहे, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी कार्यकर्त्याना केले. शिवसेना वाढवायची आहे. कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक वॉर्डात मतदार यादीतील १२३ नावे सदस्य म्हणून नोंदवायची तसेच प्रत्येक वॉर्डात १० हजारांहून अधिक सदस्यांची नोंदणी करावी असे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. यावेळी उबाठा गटाचे विलेपार्ले उपविभागप्रमुख जितेंद्र जनावळे, युवती सेनेच्या अजिता जनावळे, उपविभागप्रमुख अनिल खांडेकर, हनी सबलो, शरद पवार गटाचे मुंबई सचिव सतीश नायर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

ते पुढे म्हणाले की, निवडणुका आल्या की मुंबई तोडणार अशी भाषा काहीजण करतात पण जोपर्यंत चंद्र सूर्य आहेत तोवर कोणीही मुंबई आपल्यापासून तोडू शकत नाही. सरकार रखडलेल्या पुनर्विकासाला चालना देणार आहे आणि बाहेर फेकलेल्या मुंबईकराला पुन्हा मुंबईत आणणार असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. म्हाडा, एमएमआरडीए, महाप्रीत, एमआयडीसी अशा सर्व विभागांना एकत्र करुन ठाण्याप्रमाणेच मुंबईतही क्लस्टरच्या माध्यमातून विकास सुरु केला आहे. आपल्या सरकारने मुंबईत ७ एसटीपी केले. येत्या तीन चार वर्षात समुद्रात जाणारे काळे पाणी प्रक्रिया करुन सोडले जाईल आणि मुंबईच्या समुद्राचे पाणी निळेशार होईल, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री झाल्यानंतर मुंबईतील सर्व रस्ते दोन टप्प्यात काँक्रीटचे होणार आहेत. मात्र मुंबईच्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या नावाखाली काहीजणांनी आतापर्यंत ३५०० कोटी खाल्ले, अशी टीका शिंदे यांनी उबाठावर केली. सरकारने राज्यात ७०० बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने सुरु केले आहेत. मुंबईत ३०० एकरचे सेंट्रल पार्क होणार आहे. मात्र काहींनी साट्यालोट्यामुळे महालक्ष्मी रेसकोर्सची जमीन घेण्याची हिंमत दाखवली नव्हती पण आपण रेसकोर्सची १२० एकर जागा मिळवली, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री असताना मी मुंबईचे रस्ते धुतले आणि प्रदूषण कमी केले पण तुम्ही मात्र इतकी वर्ष तिजोरीची सफाई केली अशी घणाघाती टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठावर केली

विधानसभेत पहिल्याच भाषणा घोषणा केली होती महायुतीच्या २०० हून अधिक जागा निवडून आणू नाहीतर गावी शेती करायला जाईन. पण राज्यातील लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडक्या जेष्ठांनी महायुतीला भरभरुन मतदान केले. जनतेच्या न्यायालयात खरी शिवसेना कोण हे निवडणुकीत दाखवून दिले. खोके खोके आरोप करणाऱ्यांना महाराष्ट्राच्या जनतेने निवडणुकीत खोक्यांमध्ये बंद करुन टाकले. एकनाथ शिंदेवर विश्वास टाकला तर जीवाची बाजी लावतो. आम्ही खुर्चीसाठी नाही तर माणसे शोधतो. पदासाठी कधीही मागणी नाही केली किंवा कुठलीही तडजोड केली नाही, बाळासाहेबांचे विचार पुढे नेण्यासाठी हा उठाव केला. धर्मवीर आनंद दिघेंची शिकवण पाठिशी आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. त्यांना बाळासाहेबांचे विचार नकोत तर प्रापर्टी पाहिजे, असा टोला शिंदे यांनी उबाठाला लगावला.

ते पुढे म्हणाले की, या देशाला हिंदुत्वाचे विचार देणारे एकमेव नेते बाळासाहेब ठाकरे होते. खुर्चीचा मोह झाला आणि सगळं संपल. ते मुख्यमंत्री झाले नसते तर शिवसेना पक्ष फुटला नसता. तुम्ही सहकाऱ्यांना नोकर समजायला लागलात. मालक आणि नोकर बनवून पक्ष मोठा होत नाही, अशी खरमरीत टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली. दिल्लीत राज्यप्रमुखांची बैठक घेतली तेव्हा त्यांनी एका राज्यप्रमुखाला फोन केला आणि म्हणाले मालकासोबत राहणार की नोकराबरोबर जाणार अशी तुम्ही तुलना केली. अशाने पक्ष कधीच वाढणार नाही, असे खडे बोल उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठाला सुनावले. हा पक्ष कार्यकर्त्यांचा आहे. शिवसेना बाळासाहेबांनी जीवापाड जपली. शिवसैनिकांना जपले म्हणून आपण बाळासाहेबांचे आणि आनंद दिघेंचे विचार जपले. राज्यात सर्वसामान्यांच्या मनातले सरकार आणले. उठावानंतर झालेल्या राज्यभरातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत शिवसेना दुसऱ्या क्रमांकावर होते. त्यामुळे मोठ्या संख्येने लोक शिवसेनेत येत आहे मात्र तुमच्याकडून का जात आहेत याचे आत्मपरिक्षण करा, असा सल्ला शिंदे यांनी दिला. घटनाबाह्य किती बोलणार, मी सोन्याचा चमचा घेऊन जन्माला नाही आलो पण या महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनात सोन्याचे दिवस आणण्यासाठी मी जन्माला आलोय, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ठणकावून सांगितले. महापराक्रमी महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार मला मिळाला. एका मराठी माणसाने दुसऱ्या मराठी माणसाचा सत्कार केला. पण मला शिव्या देताना त्यांनी महादजी शिंदे यांच्या वशजांचा अपमान. साहित्यिकांचा अपमान आणि ज्यांच्यामुळे ते मुख्यमंत्री झाले त्यांचाही अपमान केला. गरज सरो वैद्य मरो अशी तुमची वागणूक आहे, असे ते म्हणाले. महायुतीत तिनही पक्ष काम करत आहेत. कोणतेही कोल्ड वॉर नाही तर विकास विरोधी काम करणाऱ्यांच्या विरोधात आमचे युद्ध आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. अयोध्येत भव्य राममंदीर आणि काश्मिरमधील कलम ३७० हटवायचे असे बाळासाहेबांचे स्वप्न होते. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पूर्ण केले पण सकाळ संध्याकाळ त्यांनाही तुम्ही शिव्या देताय. उठता बसता तुम्ही शिव्या देताय तुमची शिव्यासेना झालीय का असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठाला लगावला.

# जिल्ह्यात तूर खरेदीसाठी १२ केंद्रांना मंजुरी

## हमीभावाने ९ केंद्रावर तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी व खरेदी सुरू

अहिल्यानगर दि. १९ - आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत जिल्ह्यासाठी पणन महासंघाने तूर खरेदीसाठी १२ केंद्रांना मंजूरी दिली आहे. ९ केंद्रावरून हमीभावाने तूर खरेदीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी तसेच प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पणन अधिकारी बी.आर. पाटील यांनी दिली आहे.

हंगाम २०२४-२५ साठी तूर या पिकाची ७ हजार ५५० प्रति क्विंटल दराने १३ फेब्रुवारी २०२५ पासून खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून खालील ९ केंद्रावरून शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येत आहे.

शेवगाव तालुक्यामध्ये सुखायू फार्मर प्रोड्युसर कंपनी बोधेगाव, पाथर्डी तालुक्यात जय भगवान स्वयंरोजगार सहकारी संस्था मार्केट यार्ड पाथर्डी, श्रीगोंदा तालुक्यात शिवदत्त फार्मर प्रोड्युसर कंपनी घारगाव, रिअल ग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी घुटेवाडी, जय किसान फार्मर प्रोड्युसर कंपनी मांडवगण, राहुरी तालुक्यात राहुरी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ राहुरी, पारनेर तालुक्यात कृषि उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड पारनेर, कोपरगाव तालुक्यामध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती मार्केट यार्ड कोपरगाव तर

जामखेड तालुक्यात चैतन्य कानिफनाथ फळ प्र.सहकारी संस्था खर्डा उपबाजार समिती येथे नोंदणी करण्यात येईल.

सर्व खरेदी प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी आधारकार्डची, राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असलेले पासबुकची छायांकित प्रत, चालू वर्षाचा ८-अ व ७/१२ उतारा आणि तूर पिकाची नोंद असलेला ऑनलाईन पीकपेरा व चालू मोबाईल क्रमांक देणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी एफएक्यू दर्जाचा म्हणजेच काहीही कचरा नसलेला चाळणी करुन सुकवून माल केंद्रावर आणावा.

नाफेड/एनसीसीएफच्या स्पेसीफिकेशननुसार शेतमालाची तपासणी करण्यात येईल. नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना नोंदणीच्या क्रमवारीनुसार एसएमएस देऊन खरेदीसाठी बोलावण्यात येईल. देण्यात आलेल्या तारखेसच शेतकऱ्यांना माल खरेदी केंद्रावर घेऊन येणे बंधनकारक राहील, असेही कळविण्यात आले आहे.

# नाशिकमध्ये दोन लाचखोरांना अटक

नाशिक, १९ फेब्रुवारी : दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना सहायक वनसंरक्षक तसेच वनपालाला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकार्यांनी काल रंगेहाथ पकडले. यातील तक्रारदार यांनी शेतातील जांभळाचे व सादडाचे जुने वाळलेले झाडाचे लाकडे पिकअपमध्ये भरून गोंदे येथील पेपर मिल येथे विक्रीसाठी घेऊन जात असताना फ़ॉरेस्ट खात्याचे वनसंरक्षक निरभवने तसेच वनपाल सुरेश चौधरी व कावेरी पाटील यांनी ३१ जानेवारी रोजी पकडून मेरी म्हसरूळ या कार्यालयात गाडी जप्त केली होती. सदरची गाडी मालासह सोडण्यासाठी निरभवने यांनी वनपाल सुरेश चौधरी यांच्या मार्फत दोन हजार रुपये दंड व लाच म्हणून दहा हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांनी याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकहे तक्रार केली होती. त्यानुसार सापळा रचण्यात आला. चौधरी यांनी दोन हजार रुपये दंड व दहा हजार रुपये रोख घेऊन निरभवणे यांना फोन करून दहा हजार रुपये माझ्याकडे मिळालेले आहेत. असे कळविले असता निरभवणे यांनी तक्रारदाराला त्याची गाडीची ऑर्डर घ्यायला पाठवून दे असे फोनवर बोलले. म्हणून दोघांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वाडीवर्हे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस उपधीक्षक एकनाथ पाटील, हवालदार सुनील पवार, पोलिस नाईक योगेश साळवे, हवालदार विनोद पवार यांच्या पथकाने अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर-घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली केली.

# महाराष्ट्रात छावा सिनेमा 'टॅक्स फ्री' होऊ शकत नाही - मुख्यमंत्री

मुंबई , १९ फेब्रुवारी : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित आणि अभिनेता विकी कौशल याची प्रमुख भूमिका असलेला 'छावा' या चित्रपटाची सध्या सगळीकडे चर्चा सुरू आहे. महाराष्ट्रासह इतर राज्यात देखील अनेक ठिकाणी सिनेमा हाऊसफुल असल्याचं पहायला मिळतंय.अशातच आता छावा सिनेमा टॅक्स फ्री करावा, अशी मागणी केली जात आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता महाराष्ट्रात छावा सिनेमा 'टॅक्स फ्री' होऊ शकत नाही, असं सांगितल आहे.छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, वीरता आणि विद्धत्ता प्रचंड होती. पण इतिहासाने त्यांच्यावर नेहमी अन्याय केला. मात्र, त्यांच्यावर खूप चांगला सिनेमा आला आहे. या ऐतिहासिक सिनेमाला करमुक्त करण्याची मागणी होताना दिसतीये. परंतू एक लक्षात घ्या की, महाराष्ट्रात करमणूक करच नाहीये. परंतु महाराष्ट्राने २०१७ सालीच करमणूक कर नेहमीसाठी रद्द केला होता. त्यामुळे आपल्याकडे करमणूक करच नसल्याने करमुक्त करण्याचा विषयच येत नाही. चित्रपटाच्या प्रमोशनसाठी आणि संभाजी महाराज यांचा इतिहास सर्वत्र पोहोचवण्यासाठी आपण काय करू शकतो, यावर आम्ही प्रयत्न करू, असं आश्वासन देखील फडणवीसांनी दिलं आहे.राज्य सरकारने छावा चित्रपट करमुक्त करायला हवा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली होती. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत हिंदी चित्रपट 'छावा' करमुक्त करण्याबाबत मराठा सेवा संघ, छावा संघटना तर्फे पारोळा तहसीलदार अनिल पाटील यांना निवेदन दिलं होतं.

# शिवरायांच्या विचारांवर राज्यशासनाची वाटचाल - राधाकृष्ण विखे पाटील

नगर - छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले. त्याच विचारांवर राज्यशासन लोककल्याणासाठी काम करत आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती उत्सवानिमित्त पालकमंत्री विखे पाटील यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्यात शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन केले. प्रवरानगर येथे व्यापारी मित्र



मंडळ, लोणी खुर्द व बुद्रुक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमांना उपस्थित राहून महाआरतीत सहभागी झाले. लोणी खुर्द येथे पालकमंत्र्यांनी शस्त्रपूजन केले. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालीनी विखे पाटील आदी उपस्थित होते. पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले की, शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य अखंड हिंदुस्थानचे बलस्थान आहे. त्याग आणि संघर्षातून मिळालेले स्वराज्य टिकवून ठेवणे, आपले सर्वांचे कर्तव्य आहे .

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा संस्कृतीचा अनमोल ठेवा असल्याने तो जाणून घेणे प्रत्येकासाठी गरजेचे आहे. महाराजांनी जिंकलेल्या गड-किल्ल्यांचा अभ्यास व व्यवस्थापन कौशल्य समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

# 'छावा'ने अवघ्या चार दिवसांत कमावले तब्बल २०० कोटी

मुंबई , १९ फेब्रुवारी : विकी कौशल, रश्मिका मंदान्ना आणि अक्षय खन्ना यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'छावा' चित्रपट बॉक्स ऑफिसवर धडाकेबाज कामगिरी करत आहे.छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या ऐतिहासिक चित्रपटाने पहिल्या दिवशीच २८.५० कोटींचा दमदार गल्ला जमवला होता. त्यानंतर चौथ्या दिवशी या चित्रपटाने जगभरात तब्बल २०० कोटींची कमाई केली आहे.

मॅडॉक फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मिती झालेल्या छावाने पहिल्या दिवशीच २८.५० कोटींचा दमदार गल्ला जमवला होता. त्यानंतर चित्रपटाच्या उत्कृष्ट कथानकामुळे आणि तगड्या स्टारकास्टमुळे दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी आणखी मोठी वाढ झाली आणि तब्बल ३४ कोटींची कमाई झाली. आता तिसऱ्या दिवशी गाठला ८६ कोटी रुपयांचा टप्पा. त्यानंतर चौथ्या दिवशी या चित्रपटाने जगभरात तब्बल २०० कोटींची कमाई केली आहे. ट्रेड ट्रॅकिंग या वेबसाईटच्या आकडेवारीनुसार छावा या चित्रपटाने चार दिवसांत देशात आणि देशाबाहेर अशी मिळून बॉक्स ऑफिसवर तब्बल १४० कोटी रुपयांची कमाई सोमवारपर्यंत केली होती. त्यानंतर कलेक्शनमध्ये घट झाली आणि सोमवारी केवळ २४ कोटी कमावले. मात्र या चित्रपटाचा वारू बॉक्स ऑफिसवर असाच उधळत आहे. दुसरीकडे परदेशाच्या चित्रपटाने आतापर्यंत २७ कोटी कमावले. ज्यामुळे जगभरातील चार दिवसांची एकूण कमाई १९५.६० कोटींवर पोहोचली. त्यामुळे लवकरच हा चित्रपट २०० कोटींचा टप्पा ओलांडणार आहे. या चित्रपटाची देशभरातील कमाईचा आकडा वाढत असताना जगभरातीलही कमाईचा आकडा वाढताना दिसत आहे. अनेक ठिकाणी चित्रपटाचे शो हाऊसफुल्ल म्हणून दाखवले जात आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बेटर हाफ

सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२

# लिटिल मास्टरची 'एक छोटीशी लव्हस्टोरी'






प्रेम ही फारच जगावेगळी गोष्ट आहे. पहिल्या नजरेत आवडणारी व्यक्ती आयुष्यभराची जोडीदार बनते आणि लग्नाच्या पवित्र बंधनात बांधले जाऊन जन्मभराची गाठ पक्की होते. सेलिब्रिटींच्या जीवनातील प्रेम हे सामान्यांसाठी कायमच कुतूहलाचा विषय राहिले आहे. असेच एक सेलिब्रिटी आहेत आपले लिटिल मास्टर आणि मराठमोळे क्रिकेटपटू सुनील गावस्कर. क्रिकेटची आवड नाही असा एकही भारतीय सापडणार नाही तसाच गावस्कर माहिती नाही असा कोणताही क्रिकेटप्रेमी दिसणार नाही. नव्या पिढीलाही गावस्कर चांगले माहिती आहेत.

### जन्माचीही कहाणी मोठी रोचक

सुनील गावस्कर यांच्या जन्माची कथाही मोठी रोचक आहे. त्यांचा जन्म १० जुलै १९४९ रोजी मुंबईत झाला. त्यांचा जन्म झाला तेव्हा नर्सिंग होममध्ये एका मासेमाऱ्याच्या मुलासोबत त्यांची अदलाबदली झाली होती. मात्र, गावस्कर यांच्या काकांमुळे ते कुटुंबाला परत मिळाले. म्हणूनच गावस्कर बरेचदा गंमतीत म्हणतात की, मी कदाचित आता पश्चिम किनाऱ्यावर एखाद्या मासेमाऱ्याच्या घरी जाळे घेऊन फिरत राहिलो असतो.

सुनील मनोहर गावसकर. क्रिकेटच्या इतिहासात कधीही न पुसले जाणारे नाव. विक्रमादित्य हे बिरूद त्यांना सार्थ ठरू शकेल. १९७१ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या गावसकरांनी कसोटीत १० हजारापेक्षा जास्त धावा काढल्या आहेत. हा टप्पा ओलांडणारे ते पहिले खेळाडू. फार थोड्यांना माहिती असावे की, सुनील गावसकर यांनी 'सावली प्रेमाची' या मराठी चित्रपटात मुख्य भूमिका केली आहे. याचबरोबर त्यांनी या चित्रपटात 'या दुनियेमध्ये थांबायला वेळ कुणाला' हे गाणे म्हटले आहे. त्रिनिदाद कॅलिप्सोतील गायक लॉर्ड रिलेटर (विलियर्ड हॅरिस) यांनी गावस्करांच्या सन्मानार्थ 'गावसकर कॅलिप्सो' हे गाणे लिहिले आहे. एखाद्या खेळाडूवर गाणे तयार करण्यात आले, हा मान मिळवणारे गावस्कर हे कदाचित एकमेव भारतीय क्रिकेटपटू असावे. गावस्कर ७० ते ८० या दशकात बराच काळ भारतीय संघाचे कर्णधारही होते. भारताला १९८३ सालचा विश्वकरंडक जिंकून देण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला होता. फलंदाजीबरोबर गावसकर उत्तम क्षेत्ररक्षकही होते. यष्टीरक्षक सोडून कसोटीत १०० हून जास्त झेल घेण्याचा पहिला भारतीय होण्याचा मान त्यांनी मिळवला होता.

गावस्कर आक्रमक फलंदाज नसले तरी त्याचे फटके मारण्याचे तंत्र विशेष होते. लेट फ्लिकचे ते बादशहा होते. खऱ्या अर्थाने ते कसोटी क्रिकेटचे खेळाडू होते. त्यामुळे एकदिवसीय सामन्यात त्यांना पहिले शतक काढण्यासाठी १९८७ साल उजाडावे लागले.

कसोटीतील त्याच्या अव्दितीय कामगिरीमुळे १९८० मध्ये त्यांना व्हिस्डेन या क्रिकेटमधील प्रसिद्ध मासिकातर्फे सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू म्हणून गौरविण्यात आले. त्यांच्या क्रिकेटमधील कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरव केला आहे.निवृत्तीनंतर त्यांनी सनी डेज, रन्स अन रूइन्स व वन डे वंडर ही तीन पुस्तकेही लिहिली आहेत. सध्या ते एक प्रसिध्द समालोचक व स्तंभलेखक आहेत.

### एक विचित्र विक्रमही नावावर

सुनील गावस्कर हे जगातील एकमेव खेळाडू आहेत, ज्यांनी थेट सामन्यात अम्पायरच्या मदतीने केस कापले होते. ही गोष्ट १९७४ सालची आहे. भारतीय क्रिकेट संघ १९७४ मध्ये इंग्लंड दौऱ्यावर गेले होते. मालिकेतील पहिला कसोटी सामना मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर झाला. इंग्लंडने पहिल्या डावात ३२८ धावा केल्या होत्या. तर भारतीय संघाने पहिल्या डावात २४६ धावा केल्या होत्या. त्या काळात सुनील गावस्कर हेल्मेट न घालता फलंदाजी करत असत. गावस्कर यांचे केस कुरळे आणि लांब होते. मँचेस्टरमध्ये जोरदार वारा वाहत होता. फलंदाजी करताना त्यांचे केस वारंवार डोळ्यात जात होते. त्यामुळे त्यांना फलंदाजी करताना अडचणी येत होत्या.

दरम्यान, डिकी बर्ड या सामन्यात मैदानी पंच म्हणून कार्यरत होते. गावस्कर यांनी डिकी बर्डला त्याचे काही केस कापायला सांगितले जेणेकरून ते डोळ्यांवर येऊ नये. त्यानंतर डिकी बर्ड यांनी डाव्या डोळ्यात येणारे केस कापले. अंपायरने सुनील गावस्कर यांचे केस कापल्यानंतर त्या सामन्यात सुनील गावस्कर यांनी शतक झळकावले होते.

### मुलाच्या जन्मावेळी क्रिकेटच्या मैदानातच

गावस्कर दाम्पत्याला रोहन नावाचा मुलगा असून तोही क्रिकेटपटू आहे. १९७५-७६ च्या दरम्यान जेव्हा रोहनचा जन्म होणार होता तेव्हाच भारतीय चमूला न्यूझिलंड आणि वेस्ट इंडिजच्या दौऱ्यासाठी जायचे होते. आपण दौऱ्यावर असतानाच मुलाचा जन्म होणार, याची पूर्ण कल्पना असूनही गावस्करांनी देशाच्या टीमसोबत सामना खेळणे पसंत केले. विशेष म्हणजे, त्यांच्या पत्नीनेही या निर्णयाला सहमती दर्शवली. असे असंख्य किस्से त्यांच्या चाहत्यांना सांगता येतील. एक मात्र खरे की, ही जोडी अनुपम अशीच आहे. आजही दोघे सोबत आहेत आणि सुखाचा संसार सुरू आहे. हेल्मेट न घालणारे म्हणून सुनील गावस्कर ख्यात होते. हेल्मेट न घालताही गोलंदाजांना ते पुरून उरायचे. खेळाच्या मैदानाप्रमाणे प्रपंचाच्या धावपट्टीवरही अहंकाराचे हेल्मेट न घालता हा फलंदाज यशस्वी पारी खेळतो आहे.

### पहिल्या भेटीतच 'क्लीन बोल्ड'

सुनील गावस्कर यांची प्रेमकहाणीही त्यांच्या क्रिकेटच्या प्रवासाइतकीच रोमांचक आहे. भारताचे लिटिल मास्टर मार्शलीन मल्होत्रा यांच्या प्रेमात पडले होते. मार्शलीन या गावस्करांच्या चाहत्या होत्या. दोघांची पहिली भेट ऑटोग्राफ घेत असताना झाली होती. सुनील गावस्कर मुंबईकर तर मार्शलीन या मूळच्या कानपूरच्या आहेत. दोघांची पहिली भेट मात्र दिल्लीत झाली. मार्शलीन दिल्लीतील श्रीराम कॉलेजमधून आपले बीएचे शिक्षण पूर्ण करत होत्या. १९७३ मध्ये दिल्लीला सुरू असलेला एक सामना पाहण्यासाठी त्या स्टेडियममध्ये आल्या होत्या. सामन्यातील लंच ब्रेकदरम्यान, त्यांनी सुनील गावस्करांना स्टुडंट्स गॅलरीत उभे असलेले पोहिले आणि त्यांचा ऑटोग्राफ घेण्यासाठी गेल्या. मार्शलीनने घेतलेली स्वाक्षरी थेट गावस्करांच्या हृदयावरच कोरली गेली असावी. तिच्या सुंदर डोळ्यांनी गावस्कर त्या क्षणीच क्लीन बोल्ड झाले होते. त्यांना ही तरुणी इतकी भावली की त्यांनी तिची सगळी माहिती काढली. अगदी घराच्या चकराही मारल्या. गावस्कर आपल्या प्रेमात असल्याची मार्शलीन यांना अजिबात कल्पना नव्हती. अखेर तो दिवस उजाडला जेव्हा भारतीय संघाचा कानपूरमध्ये सामना होणार होता. त्यावेळी गावस्करांनी मार्शलीन मल्होत्राच्या घराचा पत्ता शोधून काढला आणि थेट लग्नाची मागणीच घातली. त्यावेळी त्यांनी मार्शलीन आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला सामना पाहण्यासाठी आमंत्रण दिले होते. दोघेही २३ सप्टेंबर १९७४ रोजी विवाहबद्ध झाले.

**नजरे तलाशती है जिसको**
**वो प्यारा सा ख्वाब हो तुम,**
**तुमसे मिलके मिलती है दुनिया सारी**
**इतनी लाजवाब हो तुम....**

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# गुणकारी खेडाभाजी

**अस्सल गावरान भाजी जिला झाडीबोलीत खेडाभाजी किंवा खेळाभाजी असे म्हणतात. ही भाजी आरोग्यासाठी अतिशय लाभदायक असल्यामुळे आजही खेडेगावात राहणारे लोक ही भाजी आवडीने खातात. नैसर्गिकरित्या वाढलेली, कोणत्याही किटकनाशकांची फवारणी नसलेली, कोणतेही खतपाणी न दिलेली आणि स्वत:च उगवून वाढलेली दिसते. ही अस्सल गावरान खेडाभाजी तिन्ही ऋतूंमध्ये उगवते. घराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत म्हणजेच वाडीत किंवा शेणखताच्या ढिगावर जास्त प्रमाणात मिळते. या भाजीचे झाड जास्तीत जास्त अडीच-तीन फूट उंच असते.**

हीरानभाज्या जंगलात, शेताच्या बांधावर तर काही तलावानजिकच्या मोकळ्या जागेत वाढतात. आणखी काही भाज्या घराच्या अंगणात, रस्त्याच्या कडेला आणि शेणखताच्या ढिगावर उगवतात. पण, एक मात्र नक्की की, या भाज्या आपल्या ठरलेल्या ठिकाणीच उगवतात आणि ठरावित ऋतूत तिथेच मिळतात. अशीच एक अस्सल गावरान भाजी जिला झाडीबोलीत खेडाभाजी किंवा खेळाभाजी असे म्हणतात. ही भाजी आरोग्यासाठी अतिशय लाभदायक असल्यामुळे आजही खेडेगावात राहणारे लोक ही भाजी आवडीने खातात. नैसर्गिकरित्या



वाढलेली, कोणत्याही किटकनाशकांची फवारणी नसलेली, कोणतेही खतपाणी न दिलेली आणि स्वत:च उगवून वाढलेली दिसते. ही अस्सल गावरान खेडाभाजी तिन्ही ऋतूंमध्ये उगवते. घराच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेत म्हणजेच वाडीत किंवा शेणखताच्या ढिगावर जास्त प्रमाणात मिळते. या भाजीचे झाड जास्तीत जास्त अडीच-तीन फूट उंच असते. या भाजीची पानं थोडी रुंद आणि लांब असतात. जेव्हा ही भाजी उगवायला लागते तेव्हाच तिची देठं अगदी कोवळी लुसलुशीत असतात व त्या देठाचा रंग लालबुंद असतो. झाडाची वाढ झाल्यानंतर देठ कडक होत असतो. साधारण दोन महिन्यात तिला बहार येतो. त्याला झाडीबोलीत 'भाजी फुलेली' असं म्हणतात. त्या बहारात खसखशीसारखे बारीक काळ्या रंगाचे बी असते. बहार वाळल्यानंतर या बिया खाली पडतात आणि नंतर वर्षभर ती भाजी उगवत असते. ही भाजी कितीही खाल्ली तरी कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.

उष्ण प्रकृतीची खेडाभाजी पचनक्रियेसाठी अतिशय फायदेशीर ठरते. ही भाजी बनविण्याची पद्धत फार सोपी आहे. या झाडाची पानं हातानेच तोडतात आणि झाड लहान असेल तर खालपासूनच कोवळे लुसलुशीत डिरे म्हणजे तुऱ्यांसहीत पानं तोडले जातात. नंतर, त्या भाजीला धुवून बारीक चिरून घेतले जाते. भाजीला जास्त पाणी सुटत असतो त्यासाठी एक तास आधीच भाजी धुवून ठेवली जाते. नंतर पातेल्यात थोडे तेल टाकून त्यात बारीक चिरलेले तीन कांदे, लसणाच्या तीन चार पाकळ्या, सुकलेल्या लाल मिरच्या चुरून, हळद आणि मीठ टाकून छान परतवून घेतात. भाजीचा छान खमंग सुगंध सुटतो. आवडीनुसार त्यात मुग किंवा उडदाच्या वड्यासुद्धा टाकतात. पाण्याचा एक थेंबही न टाकता, छान परतून भाजी एकजीव केली जाते. कमी आचेवर १५-२० मिनिटांत भाजी तयार होते. भाजी शिजल्यावर थोडी मोकळी होते. भात, पोळी किंवा भाकरीसोबत ही भाजी खाल्ली जाते. आरोग्याला लाभदायक असलेली ही खेडाभाजी नक्की करून बघा.

# वीरांगना वीरमती

**देवगिरीची शूरवीर कन्या वीरांगना वीरमती**
**राष्ट्रासाठी प्राण अर्पिले ना डगमगली ना हरली**
**विश्वासघात पतीचा बघूनी ज्वालासम ती धगधगली**
**घेतले प्राण क्षणातच त्याचे अन् ती पडली भूवरी**

अशीच एक कहाणी वीरकन्या वीरमतीची!

चौदावे शतक! देवगिरीवर यादवांचं राज्य होतं. सुलतान अल्लाउद्दीन खिलजी साम्राज्य विस्तार हे आपलं ध्येय घेऊन मेवाड गुजरात अशा सर्व हिंदू राज्यांवर विजय मिळवून सर्व भारत आपल्या ताब्यात घेण्याची स्वप्नं बघत होता. आपल्या साम्राज्यात अनेक प्रदेश सामील करीत, तो वेगाने निघाला होता. चित्तोड जिंकल्यानंतर त्याचं लक्ष देवगिरीसारख्या सशक्त पण छोट्याशा हिंदू राज्यावर केंद्रीत झालं होतं. देवगिरीचा शासक रामदेव यादव त्याच्या काळात राज्य एका वैभवाच्या उंचीवर होतं. इथे यादव पराक्रमी आणि धाडसी होते. हिंदूंचा ध्वज देवगिरीच्या सशक्त यादववंशीय राजाच्या हातात होता तोपर्यंत सनातन धर्माचं आपण काहीही करू शकत नाही, हे त्याला ठाऊक होतं. पराक्रमी यादवांशी लढणं अल्लाउद्दीन साठी अत्यंत कठीण होतं. देवगिरीवर आक्रमण करण्यासाठी दोन कारणं होती. त्यातलं पहिलं हे महत्त्वाचं कारण होतं आणि दुसरं अल्लाउद्दीनने गुजरातवर जेव्हा आक्रमण केलं तेव्हा तेथील एका छोट्या सूर्यवंशी राजा करण बघेला यांना पराभूत करून, त्यांची मुलगी आणि पत्नीवर वाईट नजर टाकली. राजा करण सिंह आपल्या मुली आणि पत्नीला घेऊन महाराजा रामदेव यादव यांना शरण आला. राजा रामदेवांचा एक यदुवंशी मराठा सरदार अत्यंत पराक्रमी,


शुभांगी गान/८६५७४२४०७१

साहसी आणि धाडसी होता. त्याच्या कारकिर्दीत कोणताही पराभव देवगिरीने बघितला नव्हता. मात्र, हा पराक्रमी सरदार एका युद्धात मारला गेला. त्याची मुलगी वीरमतीच्या पालनाची जबाबदारी राजा रामदेवांनी घेतली आणि एखाद्या राजकन्येप्रमाणे त्यांनी तिला वाढवलं. आपल्या लेकीच्या बरोबरीने तिचं पालनपोषण केलं आणि तिला वीरकन्या म्हणून सामर्थ्यवानही केलं. कृष्णराव या वीर पराक्रमी युवकाशी तिचा विवाह ठरवला.

याच काळात अल्लाउद्दीन खिलजीने भरपूर सैन्यासहित देवगिरीवर आक्रमण केलं. त्याला पराभूत करण्यासाठी राजारामदेवांनी कृष्णरावाच्या अधिपत्याखाली सैन्य रवाना केलं. वीरमतीने त्याला मोहिमेवर निघताना एक संदेश दिला. वीरांचं जीवन म्हणजे युद्धभूमी आणि वीरश्री म्हणजेही युद्धभूमी! तेव्हा या युद्धभूमीवर विजय मिळवूनच परत या. खरोखरच यादव सैन्याने आणि कृष्णरावाने पराक्रमाची शर्थ करीत, अल्लाउद्दीनला पराभूत केलं होतं. देवगिरी जिंकलं होतं पण...

अभिलाषा मग ती सत्तेची असो, धनाची की आणखी कशाचीही असो ती विश्वासघात करायला प्रवृत्त करते. अल्लाउद्दीन बुद्धिमान होता. त्याने कृष्णरावाला एक संदेश दिला.'आम्हाला सहकार्य कराल तर, देवगिरीचा भावी शासक म्हणून हे राज्य आम्ही तुमच्या स्वाधीन करू. कृष्णराव पराक्रमी होता. पण, सत्तेच्या मोहात अडकला होता. अल्लाउद्दीनने दाखवलेल्या मोहाला तो बळी पडला होता. प्रजा आणि सैन्य विजयाचा आनंद साजरा करत होते. त्यांचा उत्साह अत्युच्च सीमेवर पोहोचला होता. या आनंदाच्या वातावरणातच अल्लाउद्दीनने पुन्हा एकदा आक्रमण केल्याचा संदेश राजा रामदेवांना मिळाला. राजा रामदेव आश्चर्यचकित झाले होते पण, आक्रमण परतवून लावणं आवश्यक होतं. सर्व सरदारांच्या तलवारी युद्धासाठी म्यानातून बाहेर निघाल्या होत्या. मात्र, फक्त कृष्णराव म्हणाला,'आपण युद्ध करण्यापेक्षा प्रथम कूटनीतीचा उपयोग करायला हवा. खिलजीच्या प्रचंड मोठ्या सैन्याने किल्ल्याला वेढा दिलाय. त्याचं सामर्थ्य, सेना अफाट आहे. आपण चातुर्याने हा सामना करू आणि राजाला त्याचं म्हणणं पटलं. अल्लाउद्दीनपर्यंत एक संदेश देण्यासाठी कृष्णराव तत्पर झाला होता.

वीरमती या प्रत्येक घटनेचं अवलोकन करीत होती. तिच्या मनात संशय निर्माण झाला होता. अल्लाउद्दीन पराभूत झाला आणि परत एकदा तातडीने आक्रमणासाठी सिद्ध झालाय, यामागे नक्कीच काहीतरी कारस्थान असणार हे ती जाणून होती. बुद्धीमत्ता, शौर्य आणि राज्याप्रती जाज्वल्य निष्ठा हे तीन गुण तिच्यात अंतर्भूत होते. तिच्या मनात संशय निर्माण झाला होता. अल्लाउद्दीन खिलजीची भेट घ्यायला निघालेल्या, पति




कृष्णरावला ती म्हणाली की,'तुम्ही काही सैनिकांना स्वत:बरोबर न्यायला हवं. अन्यथा आम्हीही यायला तत्पर आहोत.' पण, त्याने तिच्याकडे केलेलं दुर्लक्ष तिला अधिकच संशयात टाकीत होतं. पुरुषी वेष धारण करून ती त्याच्या मागोमाग निघाली. कारस्थान नेमकं काय आहे? हे तिला जाणून घ्यायचं होतं. समोरचं दृश्य पाहून ती भयंकर चकित झाली. एका झाडीमागे कृष्णराव खिलजीच्या सेनापतीला देवगिरी किल्ल्याचे सर्व भेद मार्ग आणि आक्रमणाची नीती समजवून सांगत होता. वीरमती भयंकर संतापली. ज्या देवगिरीने त्याला इतका सन्मान दिला होता, त्या राजाशी, राज्याशी आणि यादव वंशाशी त्याने केलेली प्रतारणा करीत होता, ती तिला सहन होतं नव्हती. इतका भयंकर विश्वासघात! अशी व्यक्ती संपायलाच हवी. मग तो आपला पती असला तरीही! क्षणाचाही विलंब न करता, तिने म्यानातील तलवार उपसली आणि त्याच्या छातीत खुपसली. पण, इथेच न थांबता आपला पत्नी धर्म निभावत, तीच तलवार तिने स्वतःच्याही छातीत खुपसली. खिलजीचा सेनापती हे दृश्य बघून स्तंभित झाला. आपल्या प्रजा आणि राष्ट्रासाठी काहीही करू शकणारी ही विरांगना निश्चितच इतिहासाच्या पानांवर सुवर्णाक्षरांनी नाव कोरून गेली.

## आठवणींच्या पारावर

मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२

# विवाह बंधन नकोय?

'काय म्हणतो तुमचा आदित्य...लग्न वगैरे कधी? स्थळ बघताय की नाही?

'छे,छे...अहो कसलं काय! तो लग्नाचं काही बोलतच नाही. बत्तीसचा झालाय. चांगली नोकरी आहे.'

'काय म्हणावं या पोरांना! माझ्या बहिणीची मुलगी सायली! ती पण तिशीला आली. पण लग्नाचा विषय नको म्हणतेय. हे सगळं खूप कठीण होतंय.'

अशा चर्चा ऐकू येतात. पण हा दुराग्रह का? अखिल विश्वाला ललामभूत अशी ही आपली भारतीय विवाह संस्था! मानवी इतिहासाची साक्ष देत, निर्विवादपणे अनादी काळापासून भक्कम पाय रोवून उभी आहे. पण, हल्ली नव्या पिढीतील काही तरुणांचे या विवाहसंस्थेला नाकारणे, हे केवळ अनाकलनीय आहे.

अवास्तव आणि अतिरेकी अपेक्षांमुळे अनेकदा लग्नाचे वय उलटून गेले तरी विवाह जुळून न येणे, ही भीषण स्थिती कमीच झाली म्हणून की काय आता तर लग्न टाळणे ही प्रवृत्ती बळावते आहे? महत्वाचे की, यामागे पुष्टीदाखल सांगण्यासारखे कोणतेही सबळ कारण किंवा सिद्धांत नाहीये. यावर कुणी मनमोकळी चर्चा करीत नसल्याने निव्वळ कोंडमारा होत, तारुण्याचा बहर आणि लग्नाचे वय निघून जाणे, हे दुर्दैवी आहे. इंटरनेटमुळे हल्ली मॅरेज ब्युरो बक्कळ झालेत, चिक्कार स्थळं बघण्याची तरतूद आहे. पूर्वी स्थळ संशोधन करण्यासाठी जोडे झिजवायचे दिवस आता सरले पण, हल्ली लग्न न करण्याची नवीनच टूम बोकाळली आहे. दिवसागणिक बदलत्या युगात आपण नित्यनव्या समस्येला सामोरे जातोय.

पॅकेज किती? हा प्रश्न लग्न जुळवताना निर्णायक ठरतोय. विवाह संस्काराशी तसा त्याचा काय संबंध? याचा अर्थ सांपत्तिक स्थिती या मुद्यावर वैवाहिक आयुष्याची मुहूर्तमेढ रोवली जातेय, हे उघड आहे. परिणामी अमुक पॅकेज झाल्याखेरीज लग्नाच्या बोहल्यावर किंवा कमावत्या मुलीही, मुलाचे अमुक पॅकेज असल्याखेरीज विवाह वेदीवर उभं राहणार नाही, असा जणू त्यांचा प्रण असतो. याचा अर्थ विवाह हा दोन व्यक्तींचा नसून दोन पॅकेजचा होतोय काय? यांचे दूरगामी परिणाम खूपच भीषण आणि भयावह आहेत. भारत, चीन, इजिप्शिअन आणि लॅटिन संस्कृती पुरातन असल्याने येथे विवाहसंस्था पूर्वापार आहेत. पण, जिथे उणापुरा पाचशे वर्षांचाही इतिहास नाही, अशा देशांतही विवाह करण्याची पद्धत कशी रूढ झाली असावी? अमेरिका, युरोप आणि ऑस्ट्रेलिया खंडात भलेही घटस्फोटाचे प्रमाण जास्त असेल तरी, विवाह संस्था कोलमडलेली नाही. विवाहविधी किंवा नोंदणी पद्धतीने कोर्ट मेरेज याचे वेगळे कायदेशीर महत्त्व सर्वांना मान्य आहे. अशा स्थितीत भारतीय युवा मनात विवाह संस्थेला टाळे लावण्याचा करंटेपणा का येतो?

हल्ली सुशिक्षित मुलंमुली विवाह बंधनापासून दूर का पळतायत? घटस्फोटाचे चिंताजनक वाढते प्रमाण बघता लग्न करण्यात काय अर्थ? असा एक तकलादू युक्तीवाद करण्यात येतो. पण, हा काही उपाय नाही! ही जी पिढी आज स्वतःला फार शहाणी समजतेय ना, बघा ती पन्नाशीनंतर डिप्रेशनमध्ये जातील, असा एक कयास आहे. ज्याप्रमाणे स्थायी उत्पन्न जीवनात स्थैर्य निर्माण करते. त्याप्रमाणे, विवाह हा आयुष्याला स्थिर करतो. पूर्वी घटस्फोट या शब्दाचा उच्चार करणे देखील अशुभ समजले जाई. पण, आता तो चर्चेचा विषय झालाय! सुदृढ समाज स्वास्थ्यासाठी हे चित्र खचितच चांगलं नाही. पण, हे समजेल तोवर पाणी नाकातोंडात गेलेले असेल. पुढे काय ? साधन, सामुग्री, ऐश्वर्य जागेवर पडून राहील.

विदेशात जॉब करणाऱ्या युवकांत लग्न टाळण्यामागे अंदाजे चार प्रमुख कारणे असावीत. एक तर त्याने तिकडेच विदेशी मुलीशी विवाह उरकून घेतला असावा, किंवा तो लिव्हइन



रिलेशनशिपमध्ये राहत असावा. विवाह बंधनात न अडकता मुक्त आयुष्याचा आदी झाला असावा. त्याला काही शारीरिक समस्या असावी. कोणतेही कारण पुढे करून जबाबदारी झिडकारणे म्हणजे स्वातंत्र्य मिळविणे नव्हे! उलट तुम्ही एका मोठ्या सुखाला मुकताय. हे बुद्धिमान पिढीला सांगण्याची वेळ का यावी ? स्वैराचार, भोगवाद, चंगळवाद यांचे फलित आणि परिणाम काय असतात, याचा जरा विचार करून तर बघा. 'चार दिन की जिंदगी है, मस्तराम बनके गुजार दो' या वृत्तीने सर्व भुकेले पशू समाजाची घडी विस्कटून टाकतील. सर्वात महत्वाचे म्हणजे काका, मामा, आत्या, मावशी तसेच इतर सर्व नात्यांची वीण विस्कळीत होईल, वर्णसंकर होईल. तेव्हा कदाचित खूप उशीर झालेला असेल. कायदेशीर औरस नवी पिढी जन्माला यावी म्हणून, विवाहयोग्य वयात विवाहाची सक्ती करणारे विधेयक पारित करण्यासाठी कदाचित शासनालाच पाऊल उचलावे लागेल की काय?

पूर्वी लग्न कसे छान गप्पा करता करता जमायचे. तीन मुलं अन् तीन मुली असणारे अनेक लोक एका मागून एक सोयरीक जुळवायचे. कोणताही मुद्दा त्यांच्या प्रतिष्ठेच्या आड येत नसे. लग्नाचं वय झालं एवढंच एक कारण सोयरीक लग्न जमवायला पुरायचं. पैसा हा फारसा लुडबुडत नव्हता. आपल्या ओळखीचा, परिचयाचा, निर्व्यसनी हे प्रामुख्याने बघितलं जायचं. समंजस, गृहकृत्यदक्ष आणि संस्कारी इतकं सर्टिफिकेट मुलींसाठी पुरायचं. समस्त जगतील आदर्श आणि अनुकरणीय अशी विवाहसंस्था आपल्याकडे प्रस्थापित असताना आपण त्याकडे दुर्लक्ष करावे, याला भिकेचे डोहाळे लागणे नाहीतर काय म्हणावे? पवित्र विवाह बंधनाने, दीर्घकाळ सोबतीने परस्परांशी प्रेमाचे घट्ट नाते विणले जाते ते जीवनाच्या अंतापर्यंत साथसंगत करते. इतके की, त्या आठवणींची पुंजी प्रसंगी एकमेकांच्या माघारी रहावे लागले तरी पुरून उरते.आपली विवाह संस्था ही तारुण्यात आणि म्हातारपणात अशा दोन वेगळ्या प्रेमाच्या भूमिकेत आधार देणारी एकमेवाद्वितीय संस्था आहे. तारुण्यापेक्षाही म्हातारपणी या पूरक आधाराची गरज सर्वाधिक असते.

यामागची आयडॉलॉजी खरंच अनाकलनीय आहे. यात सर्वाधिक भयावह बाब अशी की, या चंगळवादी लोकांना संतती सौख्य नकोच की काय ? यावर पर्याय म्हणून आम्ही अनाथालयातून मूल दत्तक घेऊ, आम्ही कुत्रा किंवा मांजरी पाळू, हा एक विचित्र, हास्यास्पद आणि अफलातून प्रकार शोधून काढला आहे. कारण काय तर, मुलांचे संगोपन करायला आम्हाला वेळ नाही, सुट्या मिळत नाहीत. याचा अर्थ तुमच्या बुद्धीची कीव करण्याची परिस्थिती आलीय. कशासाठी जगताय? तुम्हाला कुठेतरी नैसर्गिक जाणीवांना वाट मोकळी करून द्यावी लागते. त्यासाठी कुणीतरी सजीव हवा. तर मग स्वत:च्या रक्तामांसाचं अपत्य असणे यापरते मोठे सुख ते काय ?

पूर्वी वय लहान असल्याने वडीलधारी मंडळी पुढाकार घेऊन लग्न जुळवीत. क्वचित प्रेमविवाहाने लग्न जुळायचे पण, आता हा स्वैर वागण्याचा तिसरा पर्याय का येतोय? हॉटेलात पैसे देऊन जेवणाची गरम थाळी समोर येते तर मग किराणा, तिखट-मीठ आणून घरी कष्ट करण्याचा त्रास कशापायी? ही वृत्ती यामध्ये दिसते. पण या मागे सखोल विचाराचा अभाव आहे. यामध्ये परस्परांची प्रेमाची बांधिलकी या सर्वात महत्त्वाच्या मुद्यालाच फाटा दिलेला दिसतो.

या वृत्तीला वेळेस पायबंद घातला गेला नाही तर, यातून भोगवाद अन् चंगळवाद बोकाळेल. जरा कल्पना करून तर बघा! ही मंडळी वृद्ध झाल्यावर आधाराला कुणी नसेल आणि पुढील पिढीची वंशवृद्धीच न झाल्याने, वृद्धाश्रमामध्ये एकाकी आयुष्य कंठायची वेळ येणार, अपेक्षांचे ओझे बाळगून भविष्याच्या बाबतीत विचार न करणारी ही पिढी स्वत:सोबत पालकांसाठी सुद्धा वृद्धत्वाच्या टप्प्यावर अनेक चिंतांना जन्म देत आहे. आयुष्याच्या अंतिम टप्प्यात जावई किंवा सून येईल, नातवंडे अंगाखांद्यावर खेळतील ही जी मातापित्यांची स्वाभाविक इच्छा असते, तिला सुरुंग लावणारी ही पिढी मातापित्यांबाबत किती कृतज्ञ आहे ते कळते.

अशाने विदेशात आहेत त्या धर्तीवर, आपल्याकडेही बास्टर्ड क्लब निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. आज जरी आपल्याकडे बास्टर्ड ही शिवी असली तरी जेथे अनौरस अपत्यांची संख्या अधिक झालीय अशा तथाकथित विकसित देशात बास्टर्ड क्लबची गरज निर्माण झाल्याने राजरोस सुरू आहेत. त्याकडे बघून तरी हे दिशाभूल झालेले जीव पुनर्विचार करतील काय ? माझा बंगला, माझी कार आणि माझा डॉगी इतकाच विचार करणे महागात पडू शकेल. आयुष्याची संध्याकाळ जवळ आल्यावर हा विचार करण्यात आपण एवढी मोठी चूक केली तर त्याचे परिणाम वैयक्तिक आयुष्यावर तर पडणारच आहेत. पण, सामाजिक संतुलन बिघडेल, आपल्या संस्कृतीचा ऱ्हास होईल. स्त्री असो वा पुरुष, आयुष्याची पूर्णत: ही वंशविस्तार, मुलांचे संगोपन, शिक्षण, गृहस्थाश्रम योग्य वेळी पार पाडण्यातच सार्थक असते. वाढत्या लोकसंख्येचा मनुष्यबळ म्हणून वापर करून चीनने प्रगती केली आहे. उलट, युरोप आणि जपानमध्ये जन्मदर आणि मृत्यूदर घटल्याने ते बिकट स्थितीला तोंड देत आहेत.

पुढील काळात लग्न न झालेल्या वयस्कर तरुण-तरुणी बहुसंख्येने दिसतील. मग गरजेनुरूप या क्षेत्राचे व्यापारीकरण होऊन व्यवसायिक वातावरणाने जागोजागी दुकाने थाटलेली दिसतील. ती स्थिती खूपच भयावह आहे. विवाहसंस्थेला सुरुंग लावून उध्वस्त करण्याचे हे कारस्थान एका मोठ्या षड्यंत्राचा भाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि नवी पिढी त्याला बळी पडतेय हे दुर्दैव!

शिवाय, समाजाची नैसर्गिक वीण पुढे कशी जाणार? निसर्गाला आव्हान देऊ नका. वंशविस्तार होणे गरजेचे आहे आणि तो ही विधिवत विवाह संस्थेच्या माध्यमातूनच! तरी एक दुर्दम्य आशावाद आहे. ही मानवनिर्मित समस्या असून यावर सहज मात करणे शक्य आहे. दुनिया गोल आहे आणि चक्र फिरून जागेवर येईल. नवी पिढी पुन्हा आपल्या अभिजात विवाहसंस्थेचे दमदार स्वागत करतील आणि स्वत:ला विवाह बंधनात अडकवण्यास आतुर होतील.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शिवजयंती जल्लोषात साजरी

## पैठण तालुक्यात शिवभक्तांचा जल्लोष शिवजयंती निमित्त हजारो शिवभक्तांनी केले छत्रपतींना केले अभिवादन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ : छत्रपती शिवाजी महाराज जंयती निमित्ताने पैठण शहरात हजारो शिवभक्तांनी अभिवादन केले. सकाळ पासुन पैठण शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती. यंदा शहराला जोडणाऱ्या प्रत्येक रस्त्यावर भगवे ध्वज हाती घेऊन तरुण जल्लोष करत होते. यावर्षी पहील्यांदा शहरासह शहरालगत असलेल्या गावागावातुन मिरवणुकीने हजारो शिवभक्तांनी अभिवादन स्थळी जमा होऊन छत्रपती चा जयघोष करत सामुहिक जिजाऊ वंदना घेत अभिवादन केले. शहरातील नारळा, गांगलवाडी, शिवनगर, भागातून वारकरी संप्रदायाच्या टाळमृंदगाच्या गजरात भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत तरुण, जेष्ठनागरीक, महीला, बालगोपाल सहभागी झाले होते.



यावर्षी जयंती उत्सव समितीच्या वतीने तालुका स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, रायबा हेच का आपले स्वराज्य, हे महानाट्य, महीलांसाठी रांगोळी स्पर्धा, मॅरथॉन स्पर्धा, रक्तदान शिबीर, तसेच समाजप्रबोधनकार प्रा. विठ्ठल कांगणेसर यांचे व्याख्यान पार पडले.या सर्व उपक्रमांना शिवप्रेमी नागरीकांनी भरभरून प्रतिसाद दिला. सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब पठाडे, कार्याध्यक्ष अनिल राऊत, किशोर पाटील शिरवत, साईनाथ पाटील कर्डीले,नीतीन देशमुख, महेश पवार, नितीन मोरे, गणेश पवार, कलाशिक्षक गणेश गोजरे,चिराग फारुकी, सुधाकर सुलताने,रितेश पहेलवान, प्रणित निकाळजे, राम भुकेले, विष्णु जगताप, विशाल बीडवे, आनंद बनकर, आदींनी परिश्रम घेतले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरुढ पुतळा परीसरात उभा केलेला रायगड शिवसृष्टीचा देखावा व परिसराला केलेली विद्युत रोषणाई मुख्य आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. तसेच शहरभर भगवे ध्वज लावल्याने संपूर्ण शहर भगवामय झाल्याचे दिसून आले. यावेळी माजी राज्यमंत्री अनिल पटेल, पाचोडचे सरपंच शिवराज भैय्या भुमरे,नगराध्यक्ष सुरज लोळगे दत्ता गोर्डे,काँग्रेसचे नेते तथा शिवाजी बँकेचे अध्यक्ष रविंद्र काळे,नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे, माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी, माजी नगराध्यक्ष राजूभाऊ गायकवाड, नपचे व्यंकटी पापुलवार, भाजपचे शहराध्यक्ष सिद्धार्थ परदेशी,राष्ट्रवादी शहराध्यक्ष जितुभाई परदेशी,खुशालराव भवरे, संभाजी सव्वाशे,नामदेव खराद, पवनराजे शिसोदे,सतिष आहेर, पवनकुमार लोहिया,सुभाष नवथर, शिवराज पारीख,गणपत मिटकर,विशाल पोहेकर, निखिल गुप्ता, सुनील वीर,उमेश तट्टू, पैठणचे सुप्रसिद्ध कलाशिक्षक गणेश गोजरे, ज्योती पाटील काकडे,अश्विनी लखमले, रेखा कुलकर्णी,आदींसह हजारो शिवभक्तांनी शिवरायांना अभिवादन केले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः (४५) **सहयोग**

१९१० मध्ये डॉक्टर शिक्षणासाठी हेडगेवार कलकत्त्याला गेले होते. तेव्हा देशाची नामांकित क्रांतिकारी संस्था अनुशीलन समिती बरोबर ते जोडल्या गेले. डॉक्टरांच्या महाविद्यालयात तेव्हा नारायणराव सावरकर पण शिकत होते. अर्थात हे दोघे मित्र होते. या समितीचे प्रमुख होते श्री पुलिनबाबू, या दरम्यान डॉक्टरांच्या अनेक क्रांतिकारकांशी गुप्त भेटी झाल्या होत्या. १९१५ मध्ये डॉक्टर बनून नागपूरला परत आले; तेव्हा ते काँग्रेसमध्ये सक्रिय झाले. व विदर्भ प्रांतीय काँग्रेसचे सचिव झाले. १९२० मध्ये काँग्रेसचे देशस्तरीय अधिवेशन झाले. त्यात डॉक्टरांनी पूर्ण स्वतंत्रता हेच ध्येय हवे असे सर्वप्रथम सांगितले होते. १९२१ मध्ये काँग्रेसच्या असहयोग आंदोलनात डॉक्टर सहभागी झाले; तेव्हा एक वर्ष जेलमध्ये होते. परंतु अहो आश्चर्यम्... जेलच्या बाहेर आले तेव्हा त्यांच्यासाठीच्या स्वागत समारंभात पंडित मोतीलाल नेहरू आणि हकीम अजमल खान अशा नेत्यांनी त्यांना संबोधित केले. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन; ५८ रक्तदात्यांनी केले रक्तदान.



गंगापूर दि.१९: गंगापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सुवर्ण सोशल फाउंडेशन गंगापूर व अमृता ब्लड बँक छत्रपती संभाजीनगर यांच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ५८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी मा.नगराध्यक्ष संजय जाधव,संतोषअंबीलवादे, पोलीस उपनिरीक्षक अनिल झोरे मा.नगरसेवक सुरेश नेमाडे,मुकुंद जोशी,सोपान देशमुख,तुकाराम सटाले,बाबासाहेब लगड, यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील अमृता ब्लड बँक यांच्या माध्यमातून सुवर्ण सोशल फाउंडेशन गंगापूरचे प्रतिक चव्हाण, पंकज डुकरे, शरद दारुंटे, कृष्णा सोळके, ओमकर जाधव, महेश इथापे आदींनी रक्तदान शिबीरासाठी प्रयत्न केले.

## गंगापूर आगारात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



गंगापूर दि.१९: राज्य परिवहन महामंडळाच्या गंगापूर आगारात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक ,महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तद्नंतर गंगापूर आगार प्रमुख विजय बोरसे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.त्यानंतर उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आला.

यावेळी कार्यशाळा अधीक्षक बालाजी तोटवाड वाहतूक निरीक्षक सौ.उज्वला जारवाल, सहायक वाहतूक निरीक्षक संदीप बागुल, आगार लेखकार अतुल बनसोड आदी अधिकारी सह आगारातील प्रशासकीय कर्मचारी, चालक, वाहक यांत्रिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फारोळा ग्रामपंचायत कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



बिडकीन दि.१९ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे सरपंच सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ वी जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून,विनम्र अभिवादन करण्यात आले,प्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी आशाताईं तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,शिवाजी गोरे, अप्पासाहेब धुमाळ,संतोष गोरे,विजयाबाई धरपळे,रेखा इंदापुरे,कोमल निकम,तेजस जाधव दिलीप गोरे,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ ज्ञानेश्वर शेळके,कृष्णा माचेवाल,अर्जुन नागे,स्वप्निल गायकवाड,सचिन गोरे,अदि गावकरी आदींची उपस्थित होते.

## चितेगाव येथे ऑनलाइन चक्री जुगारावर पोलीसांची कारवाई १,३८,८५० रुपयेचा मुद्देमाल जप्त

बिडकीन दि १९ फेब्रुवारी पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाणे हद्दीत चितेगाव येथे ऑनलाइन चक्री जुगार चालणाऱ्या अड्ड्यावर पोलीसांनी कारवाई केली आहे.सविस्तर माहिती अशी की चितेगाव येथे बेकायदेशीरपणे विनापरवाना संगणकावर पैसे लावून चक्री जुगार खेळणाऱ्या तीन जणांवर बिडकीन पोलिसांनी गुन्हा दाखल करून कारवाई केली आहे .त्यांच्या कडुन १,३८,८५० रुपयांचा मुद्देमाल रोख पंधरा हजार पाचशे रुपये एक लाख २३ हजार रुपये किमतीचे ऑनलाईन जुगारांचे साहित्य जप्त केले आहे १) किशोर शाम जावळे व्य २३ वर्ष रा चितेगाव, २) इब्रान इरफान कुरेशी वय ३६ वर्ष रा चंपा चौक पिवळी कॉलनी रोशन गेट, ३) प्रवीण बबन पटेकर वय २५ वर्ष रा रमानगर चितेगाव या तिघांना पोलीसाने ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पवार, अप्पासाहेब माळी ,यांनी कारवाई केले आहे.



## शिवसेना भवन सोयगांव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



सोयगांव,दि.१९ फेब्रुवारी : सोयगांव येथील आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाराष्ट्राचे अराध्यदैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे,कृष्णा राऊत,नगरसेवक हर्षल काळे,कदीर शहा,राजू दुतोंडे,शेख रऊफ,ड योगेश पाटील,महेश चौधरी,हर्षल देशमुख, विजय काळे,प्रभाकर तेली,युवराज वामने,शेख बबलू, श्रावण राठोड,जाकेर देशमुख,रमेश चव्हाण,भावडू गाडेकर, विजय गव्हांडे,कदीर देशमुखआदींची उपस्थिती होती.

## कंकराळा ग्रामपंचायत कार्यालयात शिवजयंती साजरी



सोयगाव,दि.१९ फेब्रुवारी : सोयगांव तालुक्यातील कंकराळा येथे बुधवार रोजी सकाळी शिवजयंती निमित्त ग्रामपंचायत कार्यालय कंकराळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवभक्त युवासेना तालुका प्रमुख तथा कंकराळा गावचे सरपंच कुणाल राजपुत हे उपस्थित होते तर ग्रामपंचायत सदस्य श्याम पाटील,दत्ता उबाळे,गोरख पवार,रत्नाताई ढाकरे,जगन हिवराळे,गावचे पोलीस पाटील विजयाताई ढाकरे,ग्रामरोजगार सहाय्यक प्रताप उबाळे, गावातील नागरिक आकाश मख,संदीप जैस्वार,अजय पाटील व गावातील महिला,पुरुष, युवक,युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिडकीन पोलीस ठाण्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



बिडकीन दि १९ फेब्रुवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्यात छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले, यावेळी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पैठण एमआयडीसी सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदाळे,पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, पोलीस उपनिरीक्षक मंजीतसिंग सेना,एस एस कदम, हनुमान धनवे, संजय चव्हाण, मगरे, संदीप धनेधर, विष्णू गायकवाड, साहेबराव राठोड, दिनेश चव्हाण, आदी पोलीस कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या उपाध्यक्षपदी योगेश बोखारे यांची बिनविरोध निवड



सोयगाव,दि.१९ फेब्रुवारी : सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या व्हॉइस चेरअरमन(उपाध्यक्ष) पदी योगेश बोखारे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल पतसंस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला,संचालक दत्तू देसाई,राजू एलीस,सुलेमान उस्मान शेख,बाबू चव्हाण,भगवान वामने पाटील,कृष्णा आप्पा कुर्लेकर,सह विकास सोसायटीचे गटसचिव दिलीप रावणे,पतसंस्थेचे मॅनेजर सिताराम गोतमारे,कॅशियर कृष्णा शेवाळकर,सह पतसंस्थेचे सभासद, माजी संचालक,मित्रपरिवार आदींच्या वतीने या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

## जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत मालोजीराजे भोसले गढीवर शिवजन्मोत्सव साजरा

खुलताबाद प्रतिनिधी : छत्रपती शिवरायांचा जन्मोत्सव जगभरात अनेक ठिकाणी संपन्न होत असतो, परंतु ज्या भूमीत स्वराज्याचे स्पुलिंग पेटले गेले,अशी मालोजीराजे भोसले गढी श्रीक्षेत्र वेरूळ येथे प्रथमच जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांचे उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवजन्मोत्सव अनेक मान्यवरांच्या आणि शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाला, याप्रसंगी बाबाजींच्या शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या भाषेमध्ये शिवछत्रपतींचे शिव विचार शिवभक्तांच्या समोर मांडले.



# ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



बिडकीन दि १९ फेब्रुवारी : शिवाजी महाराज हे पराक्रम, शौर्य आणि स्वाभिमानाचे ज्वलंत प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रवारी रोजी देशभरात शिवजयंती साजरी केली जाते. आज या निमित्ताने पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये ३९५ वी शिवजयंती उत्साहात साजरा करण्यात आली. शाळेच्या पर्यवेशिका व आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा वर्षा चव्हाण यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन व पुष्पहार घालुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. शाळेच्या पर्यवेक्षिका वर्षा चव्हाण व शाळेच्या शिक्षिका रेखा चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याबद्दल, लीडरशीप, छोटी सुरूवात अशा अनेक धाडसी जिवनशैलीवर विद्यार्थ्यांना आपल्या भाषणाद्वारे समजावुन सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ अशा अनेक वेशभुषेत येवुन उपस्थितांचे विद्यार्थ्यांनी लक्ष वेधले होते. इयत्ता पहिली ते आठवी च्या विद्यार्थ्यांनी भाषणे, नृत्य, शिवगर्जना, दैवत छत्रपती हे शिवगीत सादर करत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका ज्योती राठोड यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षक वर्षा चव्हाण, काजल देशमुख, सोनाली खोंड, अनिता धर्मे, भारती जाधव, प्रकाश करोडीवल, कृष्णा भालेराव, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## अंजली राजेंद्र कस्तुरे यांना अष्टपैलू संस्कृती कला अकादमी, मुंबई यांच्या पुरस्काराने सन्मानित

छत्रपती संभाजीनगर : मधील सिडको मधील सौ.अंजली राजेंद्र कस्तुरे यांना मुंबई येथील अष्टपैलू संस्कृती कला अकादमी यांचें तर्फे सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, आणि संस्थेचे मानवस्त्र देऊन सन्मानित करण्यात आले.



मुंबईमधील अष्टपैलू संस्कृती कला अकादमीच्या पुरस्कारा विषयी माहिती अशी की... त्यांनीं दिलेल्या विषयावर प्रत्येक महिन्याला एक काव्यरचना करुंन त्यांना पाठवायची संपूर्ण वर्षभरात एकही खंड नं पडता तुम्ही पाठवलेल्या काव्यरचनांना उत्कृष्ट /सर्वोत्कृष्ट मानांकन मिळाले तर हा पुरस्कार दिला जातो. यात सौ.अंजली राजेंद्र कस्तुरे यांनाही या !! अष्टपैलू काव्यलेखन राज्यस्तरीय गौरव पुरस्कार २०२४ !! या पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले आहे . अंजली राजेंद्र कस्तुरे यांच्या अतुलनीय कामगिरीसाठी त्यांच्यावर साहित्य क्षेत्रातील सर्वच साहित्य प्रेमी कडून कौतुकाचा वर्षाव केला जातं आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि.१९ – छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, तहसिलदार वसुधा बागुल, नायब तहसिलदार रेवणनाथ ताठे, दत्तात्रय आटुळे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी– कर्मचारी उपस्थित होते. ज्योती गरुड यांनी यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली.

## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केली दिल्ली येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या कामाची पाहणी

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ – शासनातर्फे मुंबईत इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ३५० फुट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात येत आहे. हा पुतळा बनविण्याचे काम ज्येष्ठ शिल्पकार राम सुतारयांच्या गाझियाबाद येथील कार्यशाळेत होत आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज या कार्यशाळेस भेट देऊन पुतळ्याच्या कामाची पाहणी केली.



त्यांच्या समवेत शिल्पकार राम सुतार, त्यांचे पुत्र, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, विशेष कार्य अधिकारी अभय देशमुख इ. उपस्थित होते. तसेच सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांनी पुतळ्याच्या कामाची गुणवत्ता, प्रगती, इत्यादींचा आढावा घेऊन राम सुतार आणि अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

## शिवजयंतीनिमित्त 'जय शिवाजी-जय भारत यात्रा' उत्साहात;मान्यवरांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ – छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त 'जय शिवाजी– जय भारत' या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. विविध मान्यवर, नागरिक, विद्यार्थी या यात्रेत उत्साहात सहभागी झाले. पारंपारिक वेशभूषा व साहसी खेळांच्या सादरीकरणाने लक्ष वेधून घेतले.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या क्रांतीचौक येथील पुतळ्याजवळ सकाळी साडेसात वाजता इतर मागास बहुजन कल्याण तथा दुग्धविकास व अपारंपारिक उर्जा मंत्री अतुल सावे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते शिव प्रतिमेचे पूजन करुन यात्रेस सुरुवात करण्यात आली. ढोल पथक, लेझीमच्या तालावर यात्रेची सुरुवात झाली. तलवारबाजी, सायकलींग, स्केटिंग, मल्लखांब, जिमनॅस्टिक, योगासन, पोवाडा, पाळणागीत इ. सादरीकरण यात्रेत करण्यात येत होते. त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. क्रीडा ज्योतही मान्यवरांच्या हस्ते नेण्यातआली. पैठण गेट, गुलमंडी मार्गे या पदयात्रेचा समारोप औरंगपुरा येथील महात्मा फुले पुतळ्याजवळ करण्यात आला.


## हिंगोली नगरपरिषद, हिंगोली

### सुचना

### महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार

क्रमांक.हिं.न.प./फेरबदल–३७/बुकनवाडी–०५/२१९ दिः ११/०२/२०२५

ज्याअर्थी, हिंगोली नगरपरिषद शहराची दुसरी सुधारीत विकास योजना शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस–३११८/१३९६/प्र.क्र.–१३६/२०१८/नवि–३० दिनांक १० फेब्रुवारी २०१९ अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक १० जुन २०१९ पासुन अंमलात आली आहे. तसेच उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन नगर विकास विभाग अधिसुचना क्रमांक टिपीएस–३१२०/२९६/प्र.क्र.–४२/२०२०/नवि–३० दिनांक ०५ मार्च २०२१ रोजी मंजूर झाली असून दि. २३ एप्रिल २०२१ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, मौ. बुकनवाडी सर्वे नं.०५ चे क्षेत्र हे मंजूर विकास योजनेत ग्रीन झोन या विभागात दर्शविण्यात आले आहे. जिल्ह्याचे शहर असल्याकारणाने रहिवास विभागाची मागणी जास्त प्रमाणात आहे. आवेदकाचे दि.१० डिसेंबर २०२४ आणि ०४ फेब्रुवारी २०२५ रोजीचे अर्जानुसार आणि उपरोक्त् प्रमाणे वाढत्या नागरीकरणाची विचार करता, हिंगोली नगरपरिषद ठराव क्र. ३७२, दि.०७ फेब्रुवारी २०२५ अन्वये, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत फेरबदल करण्यास आणि त्याप्रमाणे सर्व वैधानिक कार्यवाही प्रशासनामार्फत करणेबाबतचा ठराव मा. प्रशासक, हिंगोली नगरपरिषद यांनी पारित केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख प्रस्तावित फेरबदल असा करण्यात आला आहे);

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार मंजूर विकास योजनेत वापर विभागात करावयाचा फेरबदल खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

| अ.क्र | गावाचे नाव / सर्वे क्रमांक | मंजूर विकास योजनेप्रमाणे दर्शविलेला जमीन वापर विभाग | विचाराधीन क्षेत्र | प्रस्तावित प्रमाणे फेरबदलानंतर अनुज्ञेय होणरा जमीन वापर विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | मौ. बुकनवाडी सर्वे क्र.०५ | शेती आणि ना–विकास विभाग | १०.४५ हे. | रहिवास वापर (आ.क्र.९३ स्मशानभुमी आणि भागशः ३०मी. वि.यो. रस्ता वगळून) |

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजूर विकास योजनेत बापर विभागात उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित फेरबदल करण्याच्या अनुषंगाने हि सुचना नागरीकांकडून सुचना/आक्षेप मागविणेकरीता प्रसिद्ध करण्यात येत आहे. प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा, हिंगोली नगरपरिषद, हिंगोली येथे सुचनाफलकावर जनतेच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे, प्रस्तावित फेरबदलाबाबत नागरीकांना सुचना/आक्षेप असल्यास हि सुचना महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात आणि वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयास द्याव्यात. नमुद कालावाधीत प्राप्त होणाऱ्याच सुचना आक्षेप हिंगोली नगरपरिषदेमार्फत विचारात घेण्यात येईल.

**स्वाक्षरी/–**
**प्रशासक**
**तथा**
**मुख्याधिकारी**
**हिंगोली नगरपरिषद, हिंगोली**

## अग्रलेख...

# सॅम पित्रोदांची मुक्ताफळे

सत्यनारायण गंगाराम पित्रोदा उपाख्य सॅम पित्रोदा. हे महाशय ओव्हरसीज काँग्रेसचे नेते आहेत. ओडिशातील एका गुजराथी कुटुंबात ते जन्मले असले, तरी त्यांना भारत आपला देश आहे, असे वाटत नसावे. किमान त्यांच्या वक्तव्यांवरून तरी तसे सतत वाटत असते. त्यांचे ताजे वक्तव्य असे की, चीनला आपण शत्रू समजू नये आणि तसा समज करून घेणे ही अतिशयोक्ती आहे. भौतिकशास्त्रासारख्या विषयात उच्च शिक्षण घेतलेला आणि अमेरिकेत इलेक्ट्रॉनिक्समध्ये मास्टर्स केलेला हा माणूस इतका उथळ असावा, यावर विश्वास बसत नाही. पण, तो तसा आहेच आणि आपले तसे असणे सॅम पित्रोदा महाशय वारंवार सिद्ध करीत आले आहेत. गेल्या वर्षी त्यांनी भारतातील सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात संपत्तीच्या पुनर्वितरणाबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. सॅम पित्रोदा यांच्या वक्तव्याशी आपला संबंध नसल्याची भूमिका काँग्रेसने तेव्हा घेतली होती. नंतर एका मुलाखतीत सॅम पित्रोदा यांनी भारतातील वैविध्य सांगताना वांशिक टिप्पणी करून मुक्ताफळे उधळली होती. शीखविरोधी दंगल आणि पुलवामा हल्ल्याच्या वेळचीही त्यांची वक्तव्ये वादग्रस्त ठरली. आता त्यांचे ताजे वक्तव्य आहे चीनबद्दलचे. त्यापासूनही काँग्रेसने फारकत घेतली आहे. खरे तर काँग्रेसने नुसती फारकत घेणे पुरेसे नाही. काँग्रेसने सॅम पित्रोदा यांना देशाची माफी मागायला सांगितले पाहिजे किंवा त्यांचा आमच्या पक्षाशी कोणताही संबंध नाही, असे घोषित केले पाहिजे. यातले काहीही काँग्रेस करणार नाही. कारण सॅम पित्रोदा हे काँग्रेसच्या विद्यमान नेतृत्वाकडे वारशाने आलेले पात्र आहे. राजीव गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग या दोन काँग्रेसी पंतप्रधानांचे ते सल्लागार होते. काँग्रेसच्या राजवटीत ते अनेक वर्षे राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे प्रमुख होते. त्यांनी भूषविलेली पदे पाहिली तर हा माणूस अतिशय ज्ञानी आहे, यावर कुणाचाही विश्वास बसेल. पण, त्यांची वक्तव्ये वाचली, ऐकली तर हा बसलेला विश्वास पटकन संपून जाईल.

सॅम पित्रोदा हे नेहरू-गांधी कुटुंबाचे दीर्घकालीन विश्वासू व्यक्तिमत्त्व. त्यामुळे त्यांनी केलेले वक्तव्य काँग्रेसच्या खात्यात जमा होणारच. वास्तवात चीन हा भारताचा मित्र नाही, हे वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही आपण आपला शेजारी बदलू शकत नाही, या वास्तवावर विश्वास ठेवून भारताचे सरकार चीनशी वाटाघाटींच्या माध्यमातून दोन्ही राष्ट्रांतील संबंधांची हाताळणी करीत आहे. २०२० च्या गलवान व्हॅली संघर्षात २० भारतीय सैनिकांनी आपले प्राण गमावले. चिनी सैनिकांशी संघर्ष करताना भारतीय सैनिकांचा जीव गेला. त्यापूर्वी आणि त्यानंतरही सीमावर्ती भागावरील कुरघोडी सोडलेली नाही. अशा परिस्थितीत सॅम पित्रोदा यांचे ताजे वक्तव्य हे वास्तवाचे विकृतीकरण होय. चीनपासून आपल्याला धोका आहे, असे मानणे हा अतिशयोक्तीचा भाग आहे, हे पित्रोदा यांचे म्हणणे ऐतिहासिक आणि वर्तमानातील भू-राजकीय वास्तवांशी संबंध नसलेले वक्तव्य आहे. गेल्या काही वर्षांत चीनने भारताविरुद्ध आक्रमक पवित्रा स्वीकारला आहे. सीमावर्ती भाग असो, काही भागांवरील आधिपत्याचा मुद्दा असो किंवा आर्थिक हितसंबंधांचा विषय असो, भारताचे नुकसान करण्याची कोणतीही संधी चीन सोडत नाही. मार्केटमध्ये बोगस वस्तूंचा शिरकाव करण्यापासून ते सायबर थ्रेट निर्माण करण्यापर्यंत अनेक कारवाया चीन करीत असतो. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले होते. १९६७ मध्येदेखील चीनने नथु ला पास भागात आक्रमण केले होते. २०१७ मध्ये डोकलाम संघर्ष घडला. भारतीय क्षेत्रात चीनने रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला होता हे त्याचे कारण. त्यानंतर गलवान व्हॅली संघर्ष झाला. त्यात २० भारतीय सैनिकांचा मृत्यू झाला. अरुणाचल प्रदेश आणि लडाखमध्ये चीनच्या कारवायांमुळे तणाव निर्माण होतच असतो. सीमावर्ती भागातील घुसखोरी आणि वादग्रस्त प्रदेशांजवळ बांधकामे करणे ही चीनच्या विस्तारवादी मानसिकतेची उदाहरणे आहेत. या संपूर्ण पृष्ठभूमीवर भारताने चीनला शत्रू मानणे अतिशयोक्ती आहे, असे सॅम पित्रोदा यांनी म्हणणे हा भारतीय जवानांचा, त्यांनी केलेल्या बलिदानाचा अपमान ठरतो. चीन आणि भारताची सीमा तब्बल साडेतीन हजार किलोमीटर्सची आहे. ती डोंगराळ, बर्फाळ आणि खडतर आहे. त्यामुळे सीमावर्ती भागावर निरंतर पहारा देत देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना किती त्रास होत असेल, याचा अंदाज करणे कठीण आहे. चीनने सीमेवर लष्करी तैनाती वाढविली आहे. हवाई तळ, रस्ते आणि क्षेपणास्त्र तैनातीची ठिकाणे विकसित केली आहेत. पीपल्स लिबरेशन आर्मी म्हणजे चिनी लष्कराकडून सतत घुसखोरीचा प्रयत्न सुरू असतो. भारत-चीन संबंधांमध्ये व्यापार हाही एक मुद्दा आहे. चीनकडून १०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीच्या वस्तू भारत आयात करतो. त्या तुलनेत चीन भारताकडून अत्यल्प आयात करतो. म्हणजे व्यापाराचे असंतुलन आहे आणि त्याचा परिणाम भारतीय अर्थकारणावर होतोच आहे. चीनच्या बेल्ट अँण्ड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय) मुळे भारताच्या शेजारील अनेक देशांमध्ये आर्थिक अवलंबित्व निर्माण करण्यात येत आहे. त्याद्वारे भारताच्या प्रादेशिक प्रभावाला शह देण्याचा चीनचा प्रयत्न आहे. नेपाळ आणि भूतानमध्ये चीनकडून हस्तक्षेप केला जातो. हिंद महासागरात श्रीलंका, मालदीव या भागात आणि पाकिस्तानच्या ग्वादर बंदरात चीनचे नौदल उभे ठाकले आहे. पाकिस्तानला चीनचा पाठिंबा आहे. तो पाकिस्तानला शस्त्रे, अर्थसाह्य देतो आणि भारतविरोधी कारवायांसाठी त्याचा वापर करतो. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध सुधारत असल्यामुळे चीनची पोटदुखी वाढलेली आहे. भारताची अमेरिकेसोबतची धोरणात्मक भागीदारी ही लोकशाही मूल्यांवर आणि परस्पर सुरक्षा हितांवर आधारित आहे. अमेरिका ही जगातील सर्वांत जुनी लोकशाही आणि भारत हे जगातील सर्वांत मोठे लोकतांत्रिक राष्ट्र आहे. ही दोन राष्ट्रे एकत्र आल्यास चीनच्या वर्चस्वाला धोका निर्माण होतो, याची चीनला चिंता वाटणे स्वाभाविक आहे. लोकशाहीचा जयजयकार दुमदुमेल आणि चीनमधील एकचालकानुवर्ती राजवटीकडे जगाचे लक्ष वेधले जाईल, याचीही चीनला चिंता असेल. चीनमध्ये लोकशाही नाहीच. तिथे एका पक्षाचे आणि त्यातही एका व्यक्तीचे राज्य चालते. तिथली राजवट ही हुकूमशाही, दडपशाहीसाठी जगभर प्रसिद्ध आहे. चीनने सागरी भागातही कुरघोड्या सुरू केल्या आहेत. चीनच्या आक्रमकतेला तोंड देण्यासाठी क्वाड (भारत, अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया) मध्ये भारताची महत्त्वाची भूमिका आहे. तिचे महत्त्व चीनला कमी करायचा आहे. या संपूर्ण पृष्ठभूमीवर सॅम पित्रोदा यांचे विधान तथ्यात्मकदृष्ट्या चुकीचे, धोरणात्मकदृष्ट्या हानिकारक आणि राजनैतिकदृष्ट्या बेजबाबदार ठरणारे आहे, यात वाद नाही. चीनचा धोका हा अतिशयोक्त आहे, असे सांगून त्यांनी भारताच्या भूमिकेबद्दलच संभ्रम निर्माण केला आहे. काहीही म्हटले तरी सॅम पित्रोदा हे भारतीय आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांच्या वक्तव्याचा अर्थ भारतविरोधी भूमिकेसाठी काढलाच जाणार नाही, याची खात्री देता येत नाही. आंतरराष्ट्रीय संबंध ब्लॅक अँण्ड व्हाईटमध्ये पाहता येत नाहीत. त्यांना अनेक रंग असतात, छटा असतात. अनेकदा एखादा देश शत्रूसारखा वागत असला किंवा शत्रूच असला तरी त्याच्याशी गोड राहावे लागते आणि मित्र देशाशी वागतानाही सावधगिरी बाळगावी लागते. सॅम पित्रोदा यांचे वक्तव्य चीनच्या आतापर्यंतच्या क्रूर, वसाहतवादी, विस्तारवादी व आक्रमक भूमिकेचे केवळ समर्थनच नव्हे तर त्याला चारित्र्याचे प्रमाणपत्र देणारे आहे. त्याच वेळी ते भारताच्या शांततावादी भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. सॅम पित्रोदा हे काँग्रेसी असतील तर त्यांना काही गोष्टींचे स्मरण करून दिले पाहिजे. १९६७ साली इंदिरा गांधी असे म्हणाल्या होत्या की, चीनची भारताबद्दलची भूमिका सदैव द्वेषपूर्ण राहिली आहे. भारताची बदनामी करण्याची संधी चीन कधीही सोडत नाही. चीन आमच्या देशाच्या लोकतांत्रिक वाटचालीकडेही वक्र नजरेने पाहतो. १९७५ मध्ये इंदिराजींनी सिक्कीमला भारतात सामील करून घेतले. तिथल्या नागरिकांना भारतात राहायचे होते. हा प्रदेश वादग्रस्त ठरावा, असा चीनचा प्रयत्न होता. त्यावेळी चिनी सरकारच्या मुखपत्राने (चायना डेली) इंदिराजींवर टीका केली होती. नेहरू पिता-पुत्री नेहमीच असे वागतात. इंदिरा गांधी आणखी पुढे गेल्या आहेत. सॅम पित्रोदांना यातले काहीच माहिती नसेल असे नाही आणि तसे असेल तर काँग्रेसने त्यांना ते सांगावे किंवा त्यांची पक्षातून कायमची हकालपट्टी करावी.

## प्रासंगिक

# केजरीवाल यांची चौफेर कोंडी

**राहुल गोखले**

दिल्ली विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल आणि 'आप' पक्ष या दोन्हींच्या राजकीय भवितव्याचाच नव्हे, तर राजकीय अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला आहे. २०११ साली सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दिल्लीत भ्रष्टाचारविरोधी आंदोलन पुकारले होते. त्यात केजरीवाल 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' या चळवळीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. देशभर काँग्रेसविरोधी असंतोष उफाळून आला होता आणि त्याचा राजकीय लाभ उठवत केजरीवाल यांनी 'आप' पक्षाची स्थापना करीत राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. लोकानुनयी राजकारणाला कारभाराचे दिल्ली प्रारूप असे गोंडस नाव देऊन त्यांनी मतदारांना भुरळ अवश्य घातली. मात्र त्या कारभारातील पोकळपणा हळूहळू जनतेच्या दृष्टीस आणि अनुभवास येऊ लागला. अखेरीस यंदा दिल्लीत 'आप'ची सत्ता यमुनाजळी विसर्जित झाली. केजरीवाल यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा मोठ्या होत्या. २०१४ साली लोकसभा निवडणुकीत त्यांनी वाराणसी मतदारसंघात नरेंद्र मोदी यांच्याविरोधात निवडणूक लढविली होती. दिल्लीत मिळालेली सत्ता म्हणजे आपल्याला देशभर मिळालेली जनमान्यता आहे, अशी केजरीवाल यांची समजूत झाली होती. २०२२ साली पंजाबात 'आप'ला दणदणीत बहुमत मिळाले. २०२३ साली केंद्रीय निवडणूक आयोगाने 'आप'ला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा बहाल केला; तर त्याचवेळी तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय) यांची राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता काढून घेतली. या सर्व घडामोडींमुळे केजरीवाल यांची कल्पना भाजपा विरोधकांत 'आप'ला अव्वल स्थान मिळेल अशी झाली. त्या सर्व वल्गनांना दिल्लीच्या मतदारांनी वेसण घातली आहे. प्रश्न आता 'आप' आणि केजरीवाल यांचे भवितव्य काय हा आहे.

गेल्या १० वर्षांत 'आप'ने अनेक राज्यांत विधानसभा निवडणुका लढविल्या; मग त्या गोव्यात असोत किंवा गुजरातेत किंवा अन्यत्र. मात्र दिल्ली आणि पंजाब या व्यतिरिक्त 'आप'ला कुठेही यशाची चव चाखता आली नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत काँग्रेसबरोबर आघाडी करूनही 'आप'ला एकही जागा जिंकता आली नव्हती. आता तर दिल्लीही गमावली. 'आप'कडे उरलेले एकमेव राज्य म्हणजे पंजाब. तेथे 'आप'कडे दणदणीत बहुमत असले, तरी दिल्लीच्या निकालानंतर केजरीवाल यांनी पंजाबातील 'आप'च्या आमदारांची दिल्लीत जी तातडीने बैठक घेतली त्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. पंजाबात 'आप'मध्ये सर्व आलबेल नाही का हा पहिला प्रश्न. अन्यथा दिल्लीमध्ये पराभव झाला म्हणून पंजाबच्या आमदारांची बैठक घेण्यातील प्रयोजन समजत नाही. पक्षाचे आमदार पंजाबातील असताना ही बैठक दिल्लीत का घेतली हा दुसरा प्रश्न. पक्षावर अद्याप आपलीच मांड आहे, याचे प्रदर्शन केजरीवाल यांना करायचे होते म्हणून हे केले का? ती बैठक अर्ध्या तासात संपली. तेव्हा त्या बैठकीत फारशी काही चर्चा झाली असल्याची किंवा चिंतन झाले असल्याची शक्यता नाहीच. मग अशी बैठक बोलाविण्याचे कारण काय? की, दिल्ली हातची गेल्यानंतर पंजाबात मुख्यमंत्री म्हणून जाण्यासाठी केजरीवाल चाचपणी करताहेत हा या बैठकीचा अन्वयार्थ?

आपल्याला सत्तेचा हव्यास नाही, असे केजरीवाल यांनी राजकारणात येताना भासविले होते. त्यांच्या भूमिका आणि त्यांचा व्यवहार यात अनेक विसंगती आहेत. त्यांनी आपल्या सरकारी निवासस्थानावर केलेला वारेमाप खर्च हा त्यांच्या 'सामान्यांच्या राजकारणाच्या' भूमिकेशी असाच विसंगत. तेव्हा आताही पंजाबात मुख्यमंत्रिपद त्यांना खुणावत नसेलच याची शाश्वती नाही. पण पक्ष प्रमुख म्हणून केजरीवाल यांनी सूचना केली तर भगवंत सिंग मान मुख्यमंत्रिपद सोडतीलच, याची खात्री देता येणार नाही. २०१७ सालच्या विधानसभा निवडणुकीत 'आप'ला यश मिळाले असते तर केजरीवाल हेच मुख्यमंत्री झाले असते अशी चर्चा होती आणि तसे झाले असते तर मनीष सिसोदिया दिल्लीचे मुख्यमंत्री झाले असतेही. पण २०१७ साली मुळात 'आप'ला पंजाबात सत्ता मिळाली नाही आणि संभाव्य समीकरणांना विराम मिळाला. आता दिल्लीत पराभव झाल्यावर केजरीवाल पंजाबात सरकारची सूत्रे हाती घेण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसे झाले तर तेथे 'आप'मधून त्यास कसा प्रतिसाद मिळेल हा कळीचा मुद्दा आहे. मुळात केजरीवाल सध्या जामिनावर आहेत. त्यांच्याविरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत आणि आता तर त्यांच्या दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात झालेल्या कथित गैरव्यवहारांची चौकशी होण्याची शक्यता आहे. तेव्हा २०२७ साली पंजाबात मतदारांना सामोरे जाताना केजरीवाल यांचे नेतृत्व पोषक ठरेल की मारक, याची चिंता 'आप'ला आणि विशेषतः पंजाबातील पक्षनेत्यांना सतावेल, यात शंका नाही.

मुख्यमंत्रिपद नाहीच, पण साधी आमदारकीदेखील नाही अशा अवस्थेत केजरीवाल आहेत. दिल्ली महापालिकेतील 'आप'च्या काही नगरसेवकांनी भाजपामध्ये प्रवेश केल्याने तेथे राजकीय समीकरणे बदलतील आणि 'आप'चे महापौरपद धोक्यात येईल. अशा स्थितीत केजरीवाल यांना आपले राजकीय अस्तित्व टिकवायचे तर राजकारणात केवळ सक्रिय राहून पुरणार नाही तर संसदीय व्यासपीठावर स्वतःची वर्णी लावून घ्यावी लागेल. राज्यसभेत 'आप'चे काही खासदार आहेत. त्यातील कोणी केजरीवाल यांच्यासाठी राजीनामा देईल का? अन्य पक्षांत असे घडत असते. पण केजरीवाल यांना ते 'भाग्य' लाभेल का हाही प्रश्न आहे. त्यांच्यावर चालू असलेल्या खटल्यांत त्यांना दोनपेक्षा अधिक वर्षांची शिक्षा झाली तर त्यांची खासदारकी धोक्यात येऊ शकते. मग केजरीवाल यांच्यासाठी आपली खासदारकी का सोडावी, असा विद्यमान खासदारांनी पवित्रा घेतला तर नवल नाही. केजरीवाल यांची सर्व बाजूंनी कोंडी झाली आहे. १०-१२ वर्षांपूर्वी लोककल्याणाच्या, स्वच्छ राजकारणाच्या आणाभाका घेऊन केजरीवाल राजकारणात आले होते. राजकारण आणि यमुना नदी स्वच्छ करण्याची ग्वाही त्यांनी दिली होती. प्रत्यक्षात त्यांनी हे दोन्ही गलिच्छ केले. आता आत्मपरीक्षण करण्यासाठी भरपूर वेळ, पण केलेल्या घोडचुकांची दुरुस्ती करण्यासाठी फारसा अवधी नाही, अशा कात्रीत केजरीवाल सापडले आहेत. पंजाबातील 'आप'मध्ये बंडखोरी झाली नाही आणि तेथील सरकार २०२७ पर्यंत टिकले तरी दिल्लीच्या दणक्यानंतर तेथेदेखील 'आप'च्या वाट्याला तसाच पराभव आला तर आश्चर्य वाटणार नाही. लोकानुनयी राजकारण हा कार्यक्षम कारभाराला पर्याय ठरू शकत नाही हे न ओळखण्याची घोडचूक केजरीवाल यांनी केली. ती त्यांना भोवली आहे आणि ते आता राजकीय अस्तित्वाचीच लढाई खेळत आहेत. देशात अनेक पक्ष पर्यायी राजकारणाच्या उद्देशाचा गवगवा करून राजकारणात प्रवेश करतात; मतदार त्यांना संधीही देतात. पण त्या पक्षांना वैचारिक आधार नसतो आणि सत्ता अल्पावधीत मिळाल्याने संघटनात्मक बांधणीची, नेतृत्वाची फळी विकसित करण्याची निकड त्यांना वाटत नाही. अशा पक्षांचे प्रारब्ध अल्पायुषी ठरणे हेच असते. 'आप' आणि केजरीवाल त्याच वळणावर उभे आहेत. आता मागे वळून पाहताना कितीही खंत वाटली तरी पुढची वाट बिकटच नव्हे तर धूसर आहे, यात शंका नाही.

९८२२८२८८१९

## वेध

**विजय निचकवडे**

# ...आता पाकिस्तानची जिरवायलाच हवी!

चॅम्पियन्स ट्रॉफीचा यजमान यंदा पाकिस्तान आहे. परंतु, भारताने पाकिस्तानात सामने खेळण्यास नकार दिल्याने पाकिस्तानने लाहोर, कराची येथील मैदानांवर भारत वगळता अन्य देशांचे झेंडे लावले आहेत. त्यामुळे भारतात संतापाची लाट उसळणे स्वाभाविक आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी जे देश खेळणार आहेत, त्या सर्व देशांचे झेंडे लावणे आयसीसीच्या नियमांनुसार खरे तर बंधनकारक आहे. परंतु, पाकने खोडसाळपणा केला आहे. जाणीवपूर्वक भारताचा तिरंगा फडकवला नाही. भविष्यात पाकला याची मोठी किंमत चुकवावीच लागेल, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी २३ फेब्रुवारी रोजी दुबईत जो सामना खेळला जाणार आहे, त्यात भारतीय संघाने पाकला पराभूत करून पहिला धडा शिकविला पाहिजे. त्याला आणखी एक कारण आहे. पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी मध्यंतरी पाकी क्रिकेट खेळाडूंशी संवाद साधला. त्यावेळी हिंदुस्थानला पराभूत करा, असे आवाहन त्यांनी केले. यातून त्यांची भारताबाबतची द्वेषभावनाच प्रदर्शित झाली. क्रिकेट हा खेळ आहे. जय-पराजय होतच असतात. पण, भारताला पराभूत करून २४ कोटी पाकिस्तानी नागरिकांना खुश करा, असे आवाहन पाकच्या पंतप्रधानाने करणे खेळभावनेला ठेच पोहोचवणारे आहे.



पाकच्या पंतप्रधानांचे हे कृत्य पाकमधील अनेक क्रिकेटप्रेमींनाही आवडलेले नाही, हेही वास्तव आहे. भारतीय संघ पाकिस्तानात खेळत नाही, त्याला ठोस कारण आहे. जोपर्यंत अतिरेक्यांना आणि त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या दहशतवादी कारवायांना खतपाणी घालणे पाकिस्तान थांबवत नाही तोपर्यंत पाकशी कोणतेही संबंध ठेवायचे नाही, हे भारताचे धोरण आहे. याबाबत एकदा नव्हे, अनेकदा पाकिस्तानला ठणकावून सांगण्यातही आले आहे. त्यामुळे स्वत:मध्ये सुधारणा न करता पाकिस्तान फक्त भारताकडूनच अपेक्षा ठेवणार असेल तर ते योग्य नाही. भारत हा चॅम्पियन्स ट्रॉफीत खेळणारा एक प्रमुख संघ आहे. त्यामुळे भारताचा झेंडा लावणे हे पाकचे कर्तव्य होते. पण, मुद्दाम भारताला डिवचण्यासाठी पाकने जे कृत्य केले आहे, त्याला भारतीय क्रिकेट संघ प्रत्यक्ष मैदानात उत्तर देईल, हे त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. १४० कोटी भारतीयांची मनोकामना रोहित सेना पूर्ण करणार याबाबत कुणाही भारतीयाच्या मनात शंका नाही. त्यामुळे पाकशी तशीही जिरणारच आहे आणि जिरवलीही पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताने नेहमीच पाकिस्तानला पाणी पाजले आहे. आता क्रिकेटच्या मैदानावर भारतीय झेंडा न फडकविणाऱ्या पाकला रोहित, विराट, शमी, शुभमन हेच चोख उत्तर देतील. भारतीय क्रिकेट संघाची सध्याची धडाकेबाज कामगिरी पाहून पाकी क्रिकेट खेळाडू धास्तावलेच आहेत, पाकिस्तानी चाहत्यांनीही शस्त्रे खाली टाकली आहेत. रोहित, विराट, शुभमन, जडेजा, अक्षर यांसारख्या खेळाडूंची कामगिरी पाहून पाकिस्तानी क्रिकेट रसिकांनी आधीच हार मानली आहे. त्यामुळे त्यांचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी कितीही भारतद्वेष्टेपणा केला तरीही त्याचा कोणताही परिणाम भारतीय संघाच्या कामगिरीवर होणार नाही, हे निश्चित! भारतीय संघ फार आधीच दुबईत पोहोचला आहे. आपल्या खेळाडूंनी सरावही सुरू केला आहे. प्रत्येक खेळाडूच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास स्पष्ट दिसतो आहे. आपल्या खेळाडूंचा हा सराव आणि तंदुरुस्ती पाहून पाकिस्तानचे चाहते तोंडात बोटे घालत आहेत. पाकिस्तानी चाहत्यांना त्यांच्या खेळाडूंपेक्षा भारतीय खेळाडूंवर जास्त विश्वास असल्याचे चित्र स्पष्ट दिसते आहे. पाकिस्तानी क्रिकेट रसिकांच्या ज्या प्रतिक्रिया ऐकायला येतात, त्या ऐकल्यानंतर पाकिस्तानचा क्रिकेट संघ कमजोर असल्याचेच निदर्शनास येते. न्यूझीलंडचा क्रिकेट संघ नुकताच पाकिस्तानच्या दौऱ्यावर होता. त्याचवेळी इंग्लंडचा संघ भारतात टी-२० आणि एकदिवसीय मालिका खेळत होता. तिकडे न्यूझीलंडने पाकिस्तानला त्यांच्याच मैदानांवर पराभवाची धूळ चारली आणि इकडे भारताने आपल्या मैदानांवर खेळताना इंग्लंडला चारीमुंड्या चीत केले. शिवाय, फॉर्ममध्ये नसलेल्या रोहित शर्माने शतक झळकावले. विराटनेही अर्धशतक ठोकले. शुभमन गिलने तर जबरदस्त फलंदाजी केली. अक्षर पटेलनेही चुणूक दाखवली. हे सगळे पाहून पाकिस्तानचा क्रिकेट संघ, त्यांचे चाहते चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने खेळण्यापूर्वीच गलितगात्र झाले आहेत. आता मैदानात त्यांना धूळ चारण्याची औपचारिकताच तेवढी शिल्लक राहिली आहे.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# ऐतरेयोपनिषद : चराचर सृष्टी-निर्मितीचा इतिहास

**प्रा. दिलीप जोशी**

ऐतरेयोपनिषद हा ऋग्वेदांतर्गत येणारा उपनिषद आहे. या उपनिषदाचे कर्ते ऋषी महर्षी ऐतरेय महिदास आहेत. त्यांच्या आईचे नाव इतरा देवी होते. ते नितांत मातृभक्त असल्यामुळे त्यांनी त्यांचे नाव ऐतरेय धारण केले आहे. त्यावरून हा ऐतरेय उपनिषद. विशेष म्हणजे त्यांचे कुळ दास कुळ असूनही त्यांनी प्रचंड अभ्यास करून हा उपनिषद निर्माण केला. 'गुणकर्म विभागशः' सूत्राचे महिदास ऐतरेय ऋषी हे सुंदर उदाहरण आहे. या उपनिषदाचे ३ अध्याय आणि ३३ मंत्र आहेत. हे ब्रह्मविद्या प्रधान उपनिषद आहे. वेदोपनिषदातील सारगर्भ तत्त्वज्ञान सांगणारी चार महावाक्ये आहेत. १) अहं ब्रह्मास्मी २) आयमात्मा ब्रह्म ३) तत्त्वमसी ४) प्रज्ञानं ब्रह्म. यातील 'प्रज्ञानं ब्रह्म' हे महावाक्य ऐतरेय उपनिषदातील आहे. सृष्टीची रचना, मानवी शरीररचना, अन्नरचना याबाबत या उपनिषदात मंडण आहे. मानवाची निर्मिती, ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, त्यांचा कार्यकर्ता आणि ज्ञाता कोण? मृत्यूनंतर पुढे काय? जगाचा रचियता कोण? सृष्टीचे कारण कोण? नियंत्रक कोण? पालनकर्ता कोण? यावर चर्चा याच उपनिषदात आहे. साधकांनी गृहस्थाश्रमात राहून साधना करावी की गृहत्याग करूनच साधना करावी? परब्रह्म उपासनेसाठी यातील समन्वयावरही इथे चर्चा आहे. ध्यान-धारणा-प्राणायाम यावरही चर्चा आहे. या उपनिषदाची सुरुवात प्रयोजन स्पष्ट करते.

ॐ आत्मा वा इदमेक इवाग्र असिन्नन्यत्किंचन मिशत्।
स इक्षतलोकान्नु सृजा इति ॥

सर्वांत पहिले एकमात्र केवळ आत्माच होता. 'एकाकी न रमे म्हणोनी निर्मिली चौदाही भुवने' या ओवीप्रमाणे आत्म्याला एकटे वाटू लागल्याने त्याने विचार केला आणि त्याने लोकरचना करायला सुरुवात केली.

स इमां ललोकानसृजत्। अम्भोमरीचिरमापोऽदोऽंभः
परेण दिवं द्यौः प्रतिष्ठाऽन्तरिक्षं मरीचयः। पृथिवी मेरो या अधस्तात्त आपः ॥

त्याने अंभ, मरीची, मर आणि आप या चार लोकांची लोक रचना केली. द्युलोकाच्या पार स्वर्गात अंभ लोकाची रचना केली. अंतरिक्षात मरीची म्हणजे भुवलोकाची रचना केली. पृथ्वीवर मर लोकाची रचना केली. पृथ्वीच्या खाली पाताळात आप लोकांची रचना केली. ऐतरेय ऋषी यांनी मनुष्याचे शरीर आणि विराट पुरुषाचे शरीर यातील समानता विशद केली आहे. मग त्या परम आत्म्याने लोकपाल म्हणजे मनुष्य तयार करण्याचे योजिले. त्यासाठी त्याने पाण्यातून पिंड काढून त्याला आकार देऊन अवयवयुक्त जलप्रधान पुरुष पिंड तयार केला. पिंड आणि ब्रह्मांड याचा सुरेख साम्यभाव गोड शब्दात सांगितला.

तमभ्यतपत्तस्याभितप्तस्य मुखं निरभिद्यत यथाऽण्डं
मुखाद्वाग्वाचोऽग्निर्नासिके निरभिद्येतं नासिकाभ्यां प्राणः ॥
प्राणाद्वायुरक्षिणी निरभिद्येतमक्षीभ्यां चक्षुश्चक्षुष आदित्यः कर्णौ निरभिद्येतां
कर्णाभ्यां श्रोत्रं श्रोत्रद्दिशस्त्वङ्निरभिद्यत त्वचो लोमानि लोमभ्य
ओषधिवनस्पतयो हृदयं निरभिद्यत हृदयान्मनोमनसश्चन्द्रमा
नाभिर्निरभिद्यत नाभ्या अपानोऽपानान्मृत्युः
शिश्नं निरभिद्यत शिश्नाद्रेतो रेतस आपः ॥४॥

प्रथम परमात्म्याने मुख निर्माण केले ज्यात वागींद्रिय म्हणजे वाणीचे सामर्थ्य आले. त्यातून अग्नी निर्माण झाला. पुढे नासिका रंध्र म्हणजे घ्राणेंद्रिये ज्यातून वायू निर्माण झाला. त्यानंतर चक्षू म्हणजे डोळे ही दृष्टी इंद्रिये जिथे आदित्य सूर्य निर्माण झाला. नंतर कान ही श्रवणेंद्रिये त्यातून दिशा निर्माण झाल्या. त्यानंतर त्वचा या स्पर्शेंद्रियातून औषध वनस्पती निर्माण झाल्यात. हृदय या आंतरिंद्रियातून मन त्यातून चंद्रमा तर नाभीतून मलेंद्रिये त्यातून अपान वायू ज्याद्वारे मृत्यू निर्माण झाला. त्यानंतर जननेंद्रिये त्यातून रेतस ज्याद्वारे आप म्हणजे पाणी निर्माण झाले. या सर्व आप सूर्यादि देवता या पुरुषाच्या शरीरातून जलसागरात पडल्या. जेव्हा त्यांना तहान-भूक सतावू लागली तेव्हा त्या देवता परमात्म्याला म्हणाल्या, आमचे आश्रय स्थान सांगा? आमचे अन्न सांगा?

तेव्हा परमात्म्याने गौमाता निर्माण केली आणि हे तुमचे आश्रय स्थान म्हणाले. देवता म्हणाल्या ही ठीकच आहे, पण पर्याप्त नाही. मग परमात्म्याने घोडा निर्माण केला, पण देवतांना तोही पर्याप्त वाटेना. आता ईश्वराने त्या देवतांना आपण निर्माण केलेला पुरुष दाखविला. ते सुंदर रूप देवतांना भावले. मग त्यांनी आपापले स्थान निवडले. अग्नी वाणी रूपात मुखात, वायू नासिकेत प्राण रूपात, सूर्य दृष्टी रूपात नेत्रात, दिशा श्रवण रूपात कानात, औषधी रोम स्पर्श रूपात त्वचेवर, चंद्र मनाच्या रूपात हृदयात, मृत्यू नाभीमध्ये प्राणशक्ती अपान रूपात आणि जल वीर्यरूपात लिंगात समाविष्ट होऊन राहू लागले. हेच तर पिंडात ब्रह्मांड आहे. यावेळी तिथे उपस्थित क्षुधा आणि तृषा म्हणजे तहान-भूक म्हणाल्या, आमचे आश्रयस्थान सांगा? तेव्हा परमात्म्याने त्यांना वरील सर्व देवतात वाटून दिले. ज्या देवतेला जे हविषान्न दिले जाईल त्या चरूमध्ये, हवीमध्ये तुमचाही हिस्सा राहील. जसे डोळ्याला पाहण्याची भूक, कानाला ऐकण्याची भूक इत्यादी. त्यानंतर परमात्म्याने या सर्वांसाठी अन्न उत्पत्ती आणि अन्नरचना केली, पण हे अन्न या निर्माण केलेल्या पुरुषाला पाहून माघारी पळू लागले. परमात्म्याने अन्नाला बोलावले आणि आदिपुरुषाने त्याला मुखातून ग्रहण करण्याचा प्रयास केला. मुख फक्त अन्नाबद्दल बोलून तृप्त झाले; तद्वतच नाक फक्त अन्नाचे अवघ्राण करून, नेत्र केवळ अन्नाकडे पाहून तर कान फक्त ऐकून, त्वचा केवळ अन्न स्पर्शाने तर हृदय अन्नाच्या केवळ ध्यानाने तृप्त होऊ लागले. मग परमात्म्याने अपानवायू म्हणजे प्राणशक्तीद्वारा मुखाच्या छिद्रातून अन्न ग्रहण करण्याचे विराट पुरुषाला आदेशित केले. प्राणशक्ती अन्नावर निर्भर आहे. म्हणून अपानवायू अन्नग्रहण करणारा आहे. तेव्हा अन्न स्थिरावले. त्यानंतर परमात्मा केसांच्या रंध्रातून विराट पुरुषाच्या आत प्रवेशित झाले. हे परमात्मा जागृती अवस्थेत दक्षिण नेत्रात, स्वप्नावस्थेत मनात आणि सुषुप्तीत हृदयाकाशात राहतात. त्यामुळे हा विराट पुरुष म्हणजे आपला देहच पूर्णब्रह्म वाटू लागला. देवतांच्या वास्तव्यामुळे अवयवांना इंद्रद नाव पडले. पुढे 'द' काराचा लोप पावून इंद्र ही देवतांची देवता म्हणून इंद्रिय म्हणतात. हा आत्मा तीन वेळा जन्म घेतो.

आईच्या गर्भात सर्वप्रथम आत्म्याचे गर्भाधान होते. म्हणजे तो पुरुष पतिदेव वीर्यरूपाने पत्नीच्या गर्भात स्थापित होतो, त्या पत्नीच्या गर्भात पतिदेवच गर्भरूपात येतात. हा त्या पुरुषाचा पहिला जन्म. आई गर्भात भरणपोषण करते. तो गर्भरूपातला पुरुष वाढतो आणि जन्म घेतो. वडील भरणपोषण करून त्याला स्वतःच्या पायावर उभा करतात हा पुरुषाचा दुसरा जन्म. आता आपला मुलगा वारसा पुढे नेऊ शकतो ही खात्री झाल्यावर सर्वसंग परित्याग आणि मग मृत्यू. मृत्यूनंतर तो पुन्हा कुठल्या तरी गर्भात जातो हा तिसरा जन्म. पितृशरीरातून पहिला, मातृशरीरातून दुसरा आणि स्वशरीरातून तिसरा जन्म. यानंतर ज्यांचा उद्धार झाला असे वामदेव योगी सांगतात की, हा संसाराच्या वर उठून तो दिव्य लोकात जाऊन अमर होतो आणि संसारात अडकून राहिला तर पुन्हा पुन्हा जन्म घेतो. हा जन्ममरणाचा फेरा चुकावा म्हणूनच हा उपनिषद अभ्यासावा. ऐतरेय उपनिषद सृष्टीच्या उत्पत्तीचा इतिहासच आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### शिवतत्त्वासाठी 'ॐ नमः शिवाय' जप आवश्यक

माघ वद्य चतुर्दशीला महाशिवरात्र हे व्रत केले जाते. उपवास, पूजा आणि जागरण हे या व्रताचे मुख्य भाग आहेत. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाचे तत्त्व नेहमीपेक्षा एक हजार पटीने जास्त प्रमाणात कार्य करत असते म्हणून शिवतत्त्वाचा अधिक लाभ मिळावा यासाठी भगवान शिवाची भावपूर्ण पूजाअर्चा करण्याबरोबरच ॐ नमः शिवाय हा जप जास्तीत जास्त करावा. भगवान शिव रात्रीच्या एका प्रहरी विश्रांती घेतो. त्या प्रहराला म्हणजे शंकराच्या विश्रांती घेण्याच्या काळाला महाशिवरात्र असे म्हणतात. शिव हा स्वतः स्वयंप्रकाशी आहे आणि तो संपूर्ण विश्वाला प्रकाशित करतो. शिवाचे एक नाव शंकर असे आहे. शंकर म्हणजे सर्वांचे कल्याण करणारा. शिवाला देवांचे देव म्हणजे महादेव असेही म्हणतात. शिवाचे आणखी एक नाव म्हणजे महांकालेश्वर. महांकालेश्वर हा संपूर्ण विश्वाचा क्षेत्रपाल देव आहे.

**शंकर पवार**/नागपूर

### पत्रपंडित ग. त्र्यं. माडखोलकर स्मारकाची मागणी योग्य

पत्रपंडित कै. ग. त्र्यं माडखोलकर यांचे स्मारक नागपुरात व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करणारे तरुण भारतचे माजी मुख्य संपादक सुधीर पाठक यांचे मत वाचले. पुन्हा एकदा सार्वजनिकरीत्या योग्य व्यासपीठावर हा मुद्दा उपस्थित झाला, याचा आनंद आहे. कोणीतरी नव्याने ही मागणी करायला हवी होती. याआधी माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी विदर्भ साहित्य संघास १९९३ च्या सुमारास भेट दिली असताना संघाने त्यांच्या पुढ्यात दोन मागण्या ठेवल्या होत्या. एक, महाराष्ट्र शासनाचे दरवर्षी जाहीर करण्यात येणाऱ्या वाङ्मय पुरस्कारात माडखोलकरांच्या नावे एक पुरस्कार असावा आणि दुसरी माडखोलकरांचे स्मारक नागपुरात व्हावे. या दोन्ही मागण्या आश्वासन मिळूनही पूर्ण होऊ शकल्या नाहीत. पैकी पुढे माडखोलकर जन्मशताब्दी निमित्ताने ७ सप्टेंबर १९९७ रोजी प्रा. राम शेवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा घेण्यात आली. त्यात तत्कालीन पालकमंत्री नितीन गडकरी तसेच नागपुरातील प्रतिष्ठित गणमान्य मंडळी, सामाजिक, साहित्यिक, पत्रकार क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. पण तेही काम पुढे सरकले नाही.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक आघाडीचे लढवय्ये म्हणून तरी त्यांचे स्मारक व्हायला हवे होते. सुधीर पाठक यांनी माडखोलकरांच्या स्मारकाची मागणी केली, ती सफल होईल या इच्छेसह पाठक यांचे अभिनंदन!

**विलास देशपांडे**/९९६००३११४८

### प्रेरणादायी छत्रपती शिवाजी महाराज



हिंदवी स्वराज्य व्हावे, हीच श्रींची इच्छा. राजमाता जिजाऊ आऊसाहेबांच्या संस्कारातील बाळकडूमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन पडले. शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीमुळेच प्रजेला जगण्याचा हक्क प्रदान झाला. हिंदवी स्वराज्याची स्थापना आणि त्याच्या ज्वलंत इतिहासाची सुवर्णपाने घडामोडींचा वेध म्हणजे प्रत्येकाच्या नसानसात पुन्हा जगण्याची उमेद आहे. छत्रपतींच्या देदीप्यमान कामगिरीचा वेध घेणे म्हणजे शब्द अपुरे पडतात. जय भवानी, जय शिवाजी ही घोषणा अनेक वर्षांपासून प्रेरणादायी ठरत आहे. आज शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. महाराजांचे विचार आणि कर्तव्य खरोखरच प्रेरणादायी आहेत.

त्यांच्या कार्याला आणि विचारांना आपल्या आयुष्यात अनेकांनी प्रज्वलित ठेवले आहे. आणि ती जनजागृतीची मशाल पुढच्या पिढीला तितकीच महत्त्वाची वाटली म्हणून आजही दाहीदिशा छत्रपती शिवरायांच्या नामघोषाने वातावरण प्रसन्न आणि चैतन्यदायी होते. आपल्या वर्तणुकीतून शिवरायांच्या प्रतिमेला ठेच लागता कामा नये, याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे. गुण आणि संस्कारातून शिवराय जोपासणाऱ्यांच्या कार्यात साथ देण्याची गरज आहे. जातिभेदाची कवाडे गळून पडण्याची गरज आहे. गरीब-श्रीमंत भेद नाहीसा होण्याची आवश्यकता आहे. आपण सुधारलो तर सोबतचा सुधारेल, ही भावना रुजवण्याची गरज आहे. पर्यावरण संवर्धनाला महत्त्व देण्याची गरज आहे. आई-बहीण या नात्याला जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवरायांचे विचार आजही आपल्या सोबत आहेत आणि त्यांची जयंती साजरी करताना कायदा आणि नियमभंग होणार नाही, याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जय जिजाऊ...जय शिवरायाच्या घोषणांनी दुमदुमले शहर







**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज शहरात उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी शिवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण ओसंडून वाहताना दिसून आले.

शिवजयंती निमित्ताने प्रमुख मार्गासह अन्य रस्त्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे बॅनर लावण्यात आले. छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यासाठी नांदेड शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिर, अन्नदान, व्याख्यान आदी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. दुचाकी रॅली, भगवे झेंडे हातात घेऊन छत्रपती शिवरायांचा जयघोष करत आपल्या राजाला अभिवादन करण्यासाठी त्यांच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याकडे जाताना दिसत होते. सकाळीच खा. अशोकराव चव्हाण, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आ. श्रिजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, महापालिका आ. आनंद बोंढारकर, माजी आमदार अमर राजूरकर, संतूक हंबर्डे, भाजपचे प्रवीण साले, प्रजासत्ताक पार्टीचे सुरेश गायकवाड, नंदकुमार बनसोडे यांच्यासह अनेकांनी अभिवादन केले. शहरात सर्वत्र भगवेमय वातावरण पसरले. या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, पोलीस निरिक्षक परमेश्वर कदम हे बारकाईने लक्ष ठेवून होते. मोठ्या प्रमाणात जागोजागी बंदोबस्त तैनात करण्यात आला.

# कुंडलवाडी कृउबा समितीत शेतमालाची खरेदी विक्री बंद ?

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. १९ फेब्रुवारी**

कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीतील सर्व आडत व्यापाऱ्याची शेतमालाची खरेदी विक्री बंद असल्यामुळे कुंडलवाडी कृषी उत्पन बाजार समिती बंद झाली काय? अशी चर्चा सुरू आहे.

कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती एके काळी प्रसिध्द होती हया ठिकाणची मिरची,भुईमूग शेंगा ,पुणे मुंबई पर्यंत जात होती व नावारूपास आलेली होती परंतु आज याचं मार्केट कमिटीची अवस्था अतिशय बिकट होत चालली आहे याला जबाबदार कोण? हया बाबी कडे प्रशासनाचे लक्ष नाही का? अशी चर्चा होत आहे. कुंडलवाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत अ वर्ग व ब वर्गाची मिसळून जवळ पास ८१ व्यापारी परवाना धारक आहेत. त्या पैकी काही अ वर्गाच्या व्यापाऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समितीत व्यवसाय करण्यासाठी लिज वर गाळे देण्यात आलेले आहे. परंतु काही दिवसापासून बाजार समितीतील आपली दुकाने बंद ठेवून काही व्यापाऱ्यानी शहरात इतर ठिकाणी शेतकऱ्याचा माल तुर, हरभरा, सोयाबिन मोठ्या प्रमाणात खरेदी करीत आहेत त्या मुळे कृषि उत्पन बाजार समितीचे आर्थिक नुकसान होत आहे .

व्यापाऱ्यानीं बाहेर माल खरेदी करीत असल्यामुळे मार्केट फीस बरोबर देत आहेत की नाही? हया बाबतीत शंका व्यक्त होत आहे. कुंडलवाडी कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये आरळी, पिंपळगाव, बेलकोणी(खु.), गुजरी, कोल्हेबोरगाव, आदी गावचा सामावेश होतो.मार्केट कमिटीच्या बाहेर शेतं मालाची खरेदी व्यापारी करीत असल्याने समितीच्या कर्मचाऱ्याना मार्केट फिसची रक्कम जमा करण्यासाठी कार्यालय बंद ठेवून फिरावे लागत आहे.

हया बाबतीत दै.तरुण भारतशी बोलताना मार्केट कमेठीचे सचिव म्हणाले की, आम्ही व्यापारी यांना बोलावून चर्चा केली.तुम्हाला काय सोयी सुविधा हवे ते आम्ही पुर्ण करू तसेच मार्केट फिस मध्ये सवलत देवू, तुम्ही बाजार समितीत शेतकऱ्यांचा माल खरेदी करा तरी व्यापारी येण्यास तयार नाहीत मार्केटच्या बाहेर माल खरेदी करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना मार्केट फिसची रक्कम जमा करण्यासाठी फिरावे लागत आहे. जमा होणारी रक्कम अपुरी पडत असल्यामुळे कर्मचाऱ्यांचें साठ महिन्या पासून पगार नसल्याचे सचिव यांनी सांगितले. ह्या बाबतीत शासनाने लक्ष घालून बाजार समितीत असणारे प्रश्न सोडवून बाजार समितीत खरेदी विक्री सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### स्वातंत्र्यसेनानी राजारामबापू विद्यालयात शिवजयंती साजरी

**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित स्वातंत्र्यसेनानी राजारामबापू विद्यालय व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली या कार्यक्रमासाठी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवर, व कॉलेजचे प्राचार्य हेमंत इंगळे यांनी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि शौर्य, न्याय व धर्म यांचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राध्यापक सावंत, माने, शिंदे, खानसोळे, ओसावार, कपाटे, फाजगे, चव्हाण, गोळेगावकर, कदम, आडगावकर, गोवंदे, देशमुख, राजेगोरे, रेड्डी, संतोष पवार, वाळके यासह महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षेतर कर्मचारी उपस्थित होते.

### इस्लापूर येथे मोटारसायकल रॅली




**इस्लापूर**-अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने इस्लापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते.यावेळी सर्व समाज बांधवांनी या अभिवादन कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इस्लापूर व परीसरातील नवतरुणांनी भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करुन इस्लापूर ते शिवणी परीसर छत्रपती शिवाजी महाराजांच्या घोषणाबाजी करत परीसर दणाणून सोडले. या भव्य मोटार सायकल रॅली मध्ये शेकडो गाड्यांचा सहभाग होता. तर ईस्लापूर, शिवणी, जलधारा अपारावपेठ परिसरातील अनेक ठिकाणी आज छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास इस्लापूर येथील पोलिस निरीक्षक व परिसरातील सरपंच, उपसरपंच, व्यापारी बांधव, पत्रकार बांधव, महिला, पुरुष, नवयुवक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### अखंड हिंदुस्थानच्या दैवताला फुलवळ येथे ठिकठिकाणी अभिवादन

**फुलवळ**-अठरा पगड जाती-धर्माला एकत्रित घेऊन मावळे ही समान पदवी देत पर नारी ला मातेसमान दर्जा देण्याची शिकवण देणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक कुळवाडी भूषण श्रीमंत योगी राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त फुलवळ येथे ठिकठिकाणी प्रतिमेचे, पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समस्त ग्रामस्थांच्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक अभिवादन करण्यात आले. काही दिवसांपूर्वी याच चौकाच्या चबूतऱ्याला एका अज्ञात वाहनाने धडक दिल्याने चबुतरा जमीनदोस्त झाला होता . परंतु त्याच ठिकाणी नव्याने चबुतरा उभारण्यात यावा अशी अनेक शिवप्रेमी बांधवांची इच्छा होती. तेंव्हा त्याच ठिकाणी नुकताच नव्याने डौलदार चबुतरा उभारून छत्रपती शिवाजी महाराज चौकाचा फलक लावण्यात आला याच ठिकाणी शिवजयंती सोहळा पार पडला.यावेळी आनंदा पवार, राजकुमार फुलवळकर, रामलिंग मठपती, संजय फुलवळे, दत्ता डांगे, नवनाथ बनसोडे, प्रवीण मंगनाळे, परमेश्वर डांगे, होनाजी शेळगावे, शहाबुद्दीन शेख, सादख शेख, सौरभ बोरगावे, शाहू तेलंगे, रंगनाथ पांचाळ, शिवानंद मंगनाळे, अक्षय पवार, तानाजी पवार, बसवेश्वर शेळगावे, केदार देवकांबळे, संदीप मंगनाळे, गणेश मंगनाळे सह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.तसेच ग्रामपंचायत कार्यालय फुलवळ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच विमलबाई नागनाथराव मंगनाळे, ग्रामपंचायत सदस्य चंदबस आप्पा मंगनाळे, प्रवीण मंगनाळे, पत्रकार मधुकर डांगे, विश्वांभर बसवंते, धोंडीबा बोरगावे, संतोष सोमासे, हिरकांत मंगनाळे, सूर्यकांत जेलेवाड, विठ्ठल मंगनाळे, बंडू कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### शिवजयंती निमित्त दिप नगर भाजी मार्केटच्या वतीने अन्नदान



**नांदेड**-छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दिप नगर भाजी मार्केटच्या पदाधिकाऱ्यांनी अन्नदान वाटप केले. दिप नगर भाजी मार्केटची कार्यकारीणी नुकतीच जाहीर करण्यात आली असुन नवीन कार्यकारणीच्या माध्यमातून नवीन उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजे जयंती निमित्त आज अन्नदान वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा महानगर चिटणीस क्षितीज जाधव, दिप नगर मार्केट कमिटीचे अध्यक्ष सुरेश पवार, उपाध्यक्ष रवी थोरात, उपाध्यक्ष संगीता पारवे, शरद सातोरे, तथागत कांबळे, संभाजी पाटील, बालाजी वानेगावकर, कैलास गाडगीळ पावडे, रब्बनी शेख, तौफिकभाई, शेख रहीम, उत्तम तिडके, स्वप्नील ठोके आदी उपस्थित होते.

# नांदेड गोळीबार प्रकरणात आणखी दोघांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ फेब्रुवारी**

शहरात दि. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या गोळीबार प्रकरणात एटीएसच्या पथकाने आज बुधवारी आणखी दोघांना अटक केली. दुपारी या दोघांना न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर त्यांना न्यायालयाने २४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत पाठविले आहे.

गोळीबार करणाऱ्या आरोपीला मदत करणाऱ्यांची संख्या आता पाच झाली असून, त्यात चार जण नांदेडचे आहेत. तर एक पंजाब येथून आणला आहे. १० फेब्रुवारी रोजी शहिदपूरा भागात सकाळी नऊ ते साडेनऊ वाजेच्या दरम्यान गोळीबार झाला होता. या गोळीबारात गुरमितसिंग सेवादार हा जखमी झाला. तर रविंद्रसिंग राठोड याचा मृत्यू झाला. नांदेड पोलिसांना हवा असलेल्या बब्बर खालसा संघटनेचा हरविंदरसिंघ उर्फ रिंधा याचा भाऊ सत्येंद्रसिंग उर्फ सत्या याचा खून केल्याप्रकरणी गुरमितसिंघ सेवादार याला जन्मठेपेची शिक्षा झाली. तो पॅरोल रजेवर आल्यानंतर सराईत आरोपींनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यात त्याचा मित्र रविंद्रसिंग राठोड हा मृत पावला. तर सेवादार हा रुग्णालयात उपचार घेत आहे. वजिराबाद पोलिसांनी हल्लेखोराला मदत करणाऱ्या मनप्रितसिंग उर्फ मन्नू गुरुबक्षसिंग ढिल्लो आणि हरप्रितसिंग उर्फ हॅप्पी बाबूसिंग कारपेंटर या दोघांना अटक केली. त्यानंतर हा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडे वर्ग झाला. पंजाबला गेलेल्या पोलीस पथकाने कालच अर्शदीपसिंग भजनसिंग याला अटक केली. त्याला न्यायालयाने काल १ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. गोळीबार करणाऱ्या आरोपीला मदत करणाऱ्या नांदेड येथील दलजितसिंग करमसिंग संधू आणि हरजितसिंघ उर्फ राजू अमरजितसिंग गील या दोघांना एटीएसच्या पथकाने नांदेड येथून अटक केली. एटीएस पथकाचे पोलीस उपअधीक्षक रामेश्वर रेंगे, पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, माणिक बेदरे यांनी ही कामगिरी बजावली.

# धर्माचे अधिष्ठान आणि ईश्वराच्या प्रेरणेतुन विकासाची दिशा प्राप्त होते : आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १९ फेब्रुवारी**

धर्माचे अधिष्ठान आणि ईश्वराच्या प्रेरणेतुन विकासाची दिशा प्राप्त होत असते.आपण निमित्तमात्र असतो. भगवंताच्या आशीर्वादाने आमदार म्हणून मला दुसऱ्यांदा जनतेची सेवा करण्याची संधी उपलब्ध झाली या संधीचे विकास कामाच्या रूपाने सोने करून किनवट माहूर तालुक्याचे मागासलेपण दूर करण्याचा माझा संकल्प आहे असे मौलिक प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी यांनी केले आहे.

गजानन बाबा मंदिर येथे प्रगट दिनानिमित्त ६ दिवसापासुन हभप दिनेशगुरु संभाजीनगरकर महाराज यांच्या अमृतवाणीतून आयोजित केलेल्या कीर्तनाची आज सांगता झाली असून यानिमित्त श्री गजानन महाराज उत्सव समिती व माहूरगड पदयात्रा समितीच्या वतीने आमदार भीमराव केराम यांच्या सहकुटुंब सत्काराचे आयोजन केले होते त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी संस्थानचे अध्यक्ष नामदेवराव केशवे ,सचिव दारमवार,,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शंकरराव अमिलंकठवार मुकुंद लोखंडे जेष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर,विजय जोशी,स्वागत आयनेनिवार अभय महाजन,



सुनील मच्छेवार, आगरमोरे, विजय जोशी,आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

धर्माच्या अधिष्ठानावर समस्त मानव जातीचा विकास होणे आवश्यक असते ईश्वराच्या प्रेरणेतून विकासाचीदिशा प्राप्त होते असते आपण निमित्त मात्र असतो.त्यादृष्टीने मानवाला सुखदायक जिवन जगण्यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा संकल्प आहे. कोरोना काळात अडीच ते तीन वर्ष मला अपेक्षित विकासाचे ध्येय साध्य करता आले नाही.त्यानंतर १४ दिवस मी दवाखान्यामध्ये ऍडमिट होतो. परंतु भगवंताच्या आणि तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळे माझ्या आरोग्यात अमुलाग्र सुधारणा झाली एवढेच नव्हे तर ईश्वराने आमदार म्हणून दुसऱ्यांदा मला तुमची सेवा करण्याची संधी दिली. विकास कामाच्या माध्यमातून या संधीचे सोने करून किनवट माहूर तालुक्याचे मागासले पण दूर करण्याचा माझा संकल्प आहे. कीर्तनातुन ईश्वराचे नामस्मरण आणि अशा पवित्र प्रसंगी साक्षात ईश्वराच्या दरबारात माझा आणि माझ्या कुटुंबाचा सत्कार होणे हे माझे सौभाग्य आहे असे आमदार भीमराव केराम यावेळी म्हणाले. गजानन महाराज मंदिर तसेच किनवट माहूर तालुक्यातील देवस्थानाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही अशी शास्वतीही त्यांनी दिली.

प्रगट दिनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेत प्रथम आलेली कुमारी अगरमोरे हिचा आमदार केराम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दारमवार तसेच माहूर पदयात्रा समितीची राकेश बोंम्पीलवार यांनी केले आहे .सूत्रसंचालन ड.दिलीप काळे यांनी केले. हभप दिनेश संभाजीनगरकर महाराज यांनी आरती केल्यानंतर महाप्रसाद वाटपाने कीर्तनाच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नांदेड शहरातील शुक्रवार ते रविवार पर्यंतचे आठवडी बाजार राहणार बंद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ फेब्रुवारी**

राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा येत्या २१, २२ व २३ फेब्रुवारी रोजी नांदेड शहरात पार पडणार आहेत. त्याअनुषंगाने नांदेड शहरात शुक्रवार २१, शनिवार २२, रविवार २३ फेब्रुवारी रोजी भरणारे आठवडी बाजार बंद राहणार आहेत. हे आठवडी बाजार सोमवार २४ फेब्रुवारी रोजी भरणार आहेत. याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज आदेश निर्गमीत केला आहे. श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडियम तसेच यशवंत कॉलेज मैदान या परिसरात या स्पर्धा होणार आहेत.

# सदस्य नोंदणी पुर्ण केल्याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्याकडुन क्षितीज जाधव यांचे अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ फेब्रुवारी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून प्रत्येक पदाधिकारी सदस्य नोंदणी कामात व्यस्त आहेत. यात भाजपा महानगर चिटणीस यांनी अल्पावधीतच १ हजार सदस्य नोंदणी पुर्ण केली आहे. याबद्दल भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



भारतीय जनता पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. कार्यकर्त्यांपासून ते पदाधिकारी सदस्य नोंदणी कामत लागले आहेत. यात भाजपा महानगर चिटणीस क्षितीज जाधव यांनी अल्पावधीतच १ हजार सदस्य नोंदणी पुर्ण केली आहे. भारतीय जनता पार्टीचे सक्रीय आणि उपक्रमशील पदाधिकारी असलेले क्षितीज जाधव यांनी अल्पावधीतच एक हजार सदस्य नोंदणी केल्याने भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे पत्राव्दारे अभिनंदन केले आहे. तसेच भाजपाच्या अनेक पदाधिकाऱ्यांकडून त्यांचे कौतूक होत आहे.

# विजय कांबळे सारख्या होतकरू तरुणांना मदत करताना आत्मिक समाधान मिळतो : प्रशांत राठोड

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १९ फेब्रुवारी**

आर्थिक दृष्ट्या गरीबांना मदत करताना मला आत्मिक समाधान मिळतो, विजय कांबळे सारख्या एका होतकरू तरुणाला त्याच्या तुटपुंज्या व्यवसायाला उभारी देण्यासाठी मदत करुन त्याच्या कुटुंबाला आधार मिळावा या माणुसकीच्या भावनेतून आज एका भव्य अशा श्री दत्त कृपा टी स्टॉलचे उद्घाटन करताना मला मोठे समाधान मिळाले आहे.यातून कांबळे यांचेही जीवनमान नक्कीच उंचावेल! अशा सद्भावना प्रशांत राठोड यांनी व्यक्त केल्या.



तालुक्यातील पालाईगुडा येथील स्व.पिपळीबाई पुरसिंग राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र प्रशांत पुरसिंग राठोड यांच्या हस्ते माहूर तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील श्री दत्त कृपा टी स्टॉल चा उद्घाटन सोहळा प्

मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

जवळपास तीस वर्षांपासून आपल्या मनमिळाऊ व गोड स्वभावाप्रमाणेच चहा प्रेमी नागरिकांना आपल्या लज्जतदार गरमागरम चहाची माफक दरात सेवा देत असलेले विजय कांबळे यांचे आजपर्यंत तहसीलच्या प्रशासकीय इमारतीसमोरील मुख्य प्रवेशद्वाराजवळील बाजुच्या जागेवर एक छोटेशे ताटव्याचे चहाचे दुकान होते.ज्याचे आज दि.१७ फेब्रुवारी रोजी तालुक्यातील पालाईगुडा येथील रहिवासी व सध्या मुंबई येथे राहत असलेले प्रशांत पुरसिंग राठोड यांनी मोठ्या मनाने दातृत्वभावना दाखवत पुढाकार घेऊन केलेल्या भरीव आर्थिक मदतीने एका भव्य टी स्टॉल मध्ये रुपांतर झाले आहे. त्याचे उद्घाटन आज दि.१७ रोजी त्यांच्याच हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी डॉ.निरंजन केशवे,कॉ.शंकर सिडाम यांनीही विजय कांबळे या होतकरू टी स्टॉल चालकाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या.

तर अध्यक्षीय समारोप नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी केला. श्री दत्त कृपा टी स्टॉल चे उद्घाटनानंतर झालेल्या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष फिरोज दोसानी हे होते. तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्ष नाना लाड, भाजपाचे ओबीसी प्रदेश सचिव अनिल वाघमारे, डॉ.निरंजन केशवे, डॉ.अभिजीत अंबेकर,कॉ.शंकर सिडाम, कॉन्टॅक्टर विजय राठोड, गौतम महामुने,राकाँ.अजित पवार पक्षाचे ता.अ. अमित राठोड, पत्रकार बजरंगसिंह हजारी, दत्ता शेरेकर या प्रमुख पाहुण्यांसह पत्रकार विलास आडे, इलियास बावानी,गजानन भारती, वसंत कपाटे, नंदकुमार जोशी,राज ठाकुर, बाबाराव कंधारे, गणेश खडसे यासह प्रतापसिंह हजारी, अजयसिंह हजारी, विजयसिंह हजारी,रोहनसिंह हजारी,पवन शर्मा, समाधान पाऊलबुद्धे,किनवट येथील सागर हजारी,कपिल हजारी, दयाराम जाधव, वसंत जाधव यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सुत्रसंचलन अर्जुन जाधव यांनी तर आभार प्रदर्शन टी स्टॉल चालक विजय कांबळे यांनी केले.यावेळी किनवट,माहूर तालुक्यातील स्व.पिपळीबाई पुरसिंग राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या सन्मानार्थ बंजारासमाजातील नागरिकांसह सर्वधर्मीय जनसमुदाय व विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणवंत विद्यार्थी हे शाळेचे देशाचे वैभव : साहित्यीक बालाजी पेटेकर

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. १९ फेब्रुवारी**

शाळा हे उत्तम विचाराचे विचारपीठ आहे. या विचार पीठातून अनेक गुणवान विद्यार्थी घडत असतात आणि असे गुणवान विद्यार्थी हे शाळेचे गावाचे आणि इथल्या मराठी मातीचे वैभव असतात. ही मोठे होण्यासाठी शिक्षकांबरोबर गुणवंत विद्यार्थीही असणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळेचे नाव, गावाचे नाव, सर्वत्र नावारूपाला येत आसते. त्यामुळे शिक्षक हे महत्त्वाचे आहेत असे प्रतिपादन प्रख्यात साहित्यिक कथा कवी बालाजी पेटेकर खतगावकर यांनी केले. ते कुन्मारपल्ली ता. देगलूर जिल्हा नांदेड या कर्नाटकच्या सीमेवरील वरील हे गावा तील शांती वर्धक हायस्कूल कुन्मारपल्ली येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमा निमित्त प्रमुख पाहुणे व प्रमुख वक्ते म्हणून बालाजी पेटेकर खतगांवकर बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीतांनी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पी. के. पवार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षक वड्डे एम. व्ही.सर



होते. यावेळी स्नेहा शिंदे सविता म्हेत्रे, संजना म्हेत्रे, शाहू बिरादार, वैशाली शेरीकर, अर्चना राठोड, वेदिका धर्मवाड, अंकिता डोंगरे, इत्यादी जणांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर बालाजी पेटेकर सर यांनी विविध कवितांनी मुलांना मनमुराद आनंद दिला. त्याच बरोबर त्यांची 'काजळमया' ही कथेचे सादरीकरण करून उपस्थित विद्यार्थ्यांना खूप हसवले आणि शेवटी अंतर्मुख व्हायला भाग पाडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चव्हाण एस.टी यांनी केले तर आभार प्रदर्शन कलाध्यापक सुंकेवार बालाजी यांनी मांडले. या निरोप समारंभावेळी अर्चना गंदिगुडे, हलबुर्गे श्रावणी, भाईदोडे, मुकपोगले सुमन, पवार इशाका, धर्मवाड शाहूबाई, जोळदापके प्रतीक्षा, बासे शाहू, वेदांती केरे, संध्याराणी शेरीकर, राजश्री म्हेत्रे, बिरादार अंजली, डोंगरे रेवती, कांबळे आखिला, पाटील लिंगराज, काळे आशिष, गंगाजी रेणुका, गंगाजी अंजली, बालूरे दीपिका, गनिमे शुभांगी, म्हेत्रे संध्या, जडगे शुभांगी, अपाने सिंधू, डोंगाले साक्षी, शिंदे रेणुका, मसूरे पौर्णिमा, पाटील श्रीकांत, आर्या सरपंच, संतोष इबितवार, उमाकांत बंडे, गंगाजी युवराज इतर अनेक विद्यार्थी, गावातील पालकांची ही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाभरात शिवजयंती उत्साहात साजरी



(छाया–श्रीकांत कुलकर्णी)

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ फेब्रुवारी** )–

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त संपूर्ण बीड जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण आहे. जनसामान्यांमध्ये स्वाभिमानाची भावना निर्माण करून अठरापगड जातीच्या मावळ्यांना एकत्र करत हिंदवी स्वराज्य स्थापन करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या निमित्त आज बीड शहरात आणि जिल्ह्यात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम आणि कलाविष्कार असणाऱ्या कला प्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान आज सकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळा परिसरात जिल्हाधिकारी अविनाश पाठक, आ.संदिप क्षीरसागर, पोलिस अधीक्षक नवनित कॉवत, जि.प.च्या मुख्य कार्यकायरी अधिकारी आदित्य जीवने यांच्यासह हस्ते शासकीय महापुजा करण्यात आली. यावेळी माजी आ.सय्यद सलिम, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रा.सत्येंद्र पाटील, उपाध्यक्ष हाजी नसीम इनामदार यांच्यासह विष्णु वाधमारे, दिपक कर्नावट, डॉ.शिवाजी सानप, झुंजार धांडे, राजेंद्र मस्के, अशोक रोमण, नितीन धांडे यांच्यासह नागरिक, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरामध्ये विविध ठिकाणी विविध संघटनांकडून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तर काही ठिकाणी शिवप्रेमींनी खिचडी वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज परिसर घोषणांनी दणाणून गेला.

# मेहनतीने अभ्यास करून वैद्यकीय क्षेत्रात नाव कमवा– संचालक डॉ. आदिती सारडा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ फेब्रुवारी**

आदित्य दंत महाविद्यालयात प्रवेश मिळालेले सर्व विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्रात चांगले करिअर करून रुग्णांची आणि आपल्या देशाची सेवा करणार आहेत. त्यात शंका नाही. मात्र कठोर मेहनत घेऊन अभ्यास केला तर वैद्यकीय क्षेत्रात मोठ नाव कमवता येइल. त्यासाठी प्रत्येकानी कठोर परिश्रम घ्यावेत असे आवाहन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

आदित्य दंत महाविद्यालया मध्ये नव्या विद्यार्थ्यांसाठी १७ फेब्रुवारी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या फ्रेशर्स पार्टी निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. आदिती सारडा बोलत होत्या.आदित्य शिक्षण संस्थेचे मुखप्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांचा मार्गदर्शनाखाली हा कार्यकर्म आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे सी.ए. गिरीश गिल्डा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. या वेळी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा, आदित्य दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिमांशू श्रीवास्तव, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य शाम भुतडा यांची उपस्थित होते.

नव्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी व त्यांना प्रेरणा देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होती. यावेळी प्रमुख पाहुणे सी.ए. गिरीश गिल्डा, डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांना डॉक्टर म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मेहनतीने अभ्यास करून वैद्यकीय क्षेत्रात नाव कमावण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ.हिमांशू श्रीवास्तव आणि डॉ.नेहा मुंडे यांनी केले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नेहा मुंडे यांनी तर प्रास्ताविक डॉ. हिमांशू श्रीवास्तव यांनी केले. त्यांनी नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक समिती डॉ. समीरा खुरेशी, डॉ.समीरा खुरेशी, डॉ.अर्पिता गुर, डॉ.मंगेश अंधारे, डॉ.हरिकुमार मेमपल्ली, डॉ.मयूर अवचार, डॉ.प्रांजल लिंबगावकर,डॉ.सयेदा हाजेर,डॉ. सोनाली तलरेजा, डॉ.मोनिका ढेरे यांनी परिश्रम घेतले.

३०० विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रम तब्बल ४ तास रंगला आणि विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्साह व मान्यवरांचे प्रोत्साहन भरभरून दिसून आले. या पार्टीतील मुख्य आकर्षण होते ची. श्रीशीहशी आणि चळीी श्रीशीहशी स्पर्धा, ज्यामध्ये नव्या विद्यार्थ्यांनी आपली प्रतिभा सादर करून सगळ्यांची मनं जिंकली. आभार डॉ.सुमैया शेख यांनी केले.

महाविद्यालयात मैत्रीपूर्ण वातावरणामुळे मी आनंदी–मृणाली शिरसाठ

नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपले अनुभव शेअर करत फ्रेशर्स पार्टीबद्दल समाधान व्यक्त केले. मृणाली शिरसाठ (इउड्ढ २पव ) या विद्यार्थिनीने आदित्य डेंटल कॉलेजच्या मैत्रीपूर्ण वातावरणामुळे मी इथे खूप आनंदी आहे येथील मिळणारे वैद्यकीय शिक्षण अध्यापक करणारे प्राध्यापक चांगले असून मला एक चांगले महाविद्यालय मिळाले असल्याचे मृणाली शिरसाठ म्हणाली.

# महाशिवरात्री निमित्त कुर्ला येथील महादेव मळी संस्थानावर आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

**२६ फेब्रुवारीला पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्रवीड गुरूजी वाराणसी यांची उपस्थीती**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ फेब्रुवारी**

बीड तालुक्यातील कुर्ला येथील महादेव मळी संगमेश्वर संस्थानावर महाशीवरात्री निमित्त आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे.सकाळी ९ वाजता कुर्ला येथील हनुमान मंदिरावर मिरवणूकीनंतर फुले टाकली जाणार आहे. येत्या बुधवार २६ फेब्रुवारी रोजी वाराणसी येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी हे उपस्थीत राहणार आहेत.

कुर्ला येथील संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे भगवान बाबा टाकळगांवकर यांच्या अधिपत्याखाली व बबन महाराज मस्के यांच्या हस्ते आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे.येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत हा सप्ताह चालणार आहे. आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत शामराव महाराज नेरकर, शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी आळंदी येथील कीर्तनकार पांडुरंग महाराज क्षीरसागर, शनिवार २२ रोजी ज्ञानेश्वर महाराज कदम, रविवार २३ रोजी सत्यवान महाराज लाटे, सोमवार २४ रोजी मारुती महाराज



तुनतुने, मंगळवार २५ रोजी सच्चिदानंद महाराज कांबेकर, बुधवार २६ रोजी आळंदी येथील यशोधन महाराज साखरे यांची कीर्तने होणार आहेत. येत्या गुरूवार २७ रोजी पुरुषोत्तम उर्फ बबन महाराज मस्के यांचे दुपारी १२ ते २ काल्याचे कीर्तन होणार आहे. कुर्ला पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसाद लाभ घ्यावा असे आवाहन संतोष मोरे यांनी केले आहे

विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

संगमेश्वर संस्थान महादेव मळी कुर्ला येथे अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, भजण, शिवलीलामृत पारायण,गाथा भजण, भावार्थ रामायण,हरिपाठ,हरिकिर्तण ,जागर अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन या सप्ताह मध्ये परिसरातील भजनी मंडळी येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत उपस्थिती राहणार आहेत.

# पेन्शन अदालत व कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ फेब्रुवारी**

सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, दि.२१.०२.२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता समाज कल्याण कार्यालय आवारातील आंबेडकर भवन येथे पेन्शन अदालत व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

महालेखापाल नागपूर व कोषागार कार्यालय बीड यांच्या वतीने निवृत्तीवेतन धारकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पेन्शन अदालत आयोजित केलेली आहे.

तरी जिल्हा कोषागार अधिकारी बीड यांच्या वतीने जिल्हयातील सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी व संबंधित लिपीक व निवृत्तीवेतन धारक यांना विनंती करण्यात येते की, आपण आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक अभिलेखे घेवून वरील स्थळी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांना केले आहे.

# डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ फेब्रुवारी**

अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि.११-१०-२०१३ अन्वये राज्यातील मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभुत सुविधा निर्माण करणे, ग्रंथालयासाठी अनुदान, शिक्षकांचे मानधन इत्यादी लाभ देण्यासाठी सदर योजना सन २०१३-१४ पासुन राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२४-२५ या वर्षात राबविण्याबाबत अल्पसंख्याक विकास विभाग, परिपत्रक अविवि-२०२४/प्र.क्र.६७/का.६, दिनांक-१३.०२.२०२५ अन्वये नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने इच्छुक मदरशांनी या डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना, शासन निर्णय क्र. अविवि-२०२४/प्र.क्र.१५२/१०/का. ६, दिनांक ११.१०.०१३ च्या शासन निर्णयासोबत दिलेल्या विहीत नमुन्यात परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बीड या कार्यालयात दिनांक १५ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी २०२५ दुपारी ५.०० वाजे पर्यंत सादर करण्याबाबत दिनांक-१३.०२.२०२५ च्या शासन परिपत्रकात सादर करण्याबाबत सुचित केले आहे.

प्रस्तावात पेयजलाची सोय करणे. (वॉटर प्युरीफारयर ची सोय),इन्व्हर्टरची सोय करणे या सोयी-सुविधांची मागणी असणे गरजेचे असल्याबाबत नमुद केले आहे. विहीत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

# जि.प.प्रा.रिधोरी शाळेत शिवजयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ फेब्रुवारी**

जि. प. प्रा. शाळा रिधोरी, केंद्र टाकरवन, येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तृत्वावर भाषणे केली. तसेच मुलांनी व मुलींनी शिवाजी महाराज व जिजाऊंच्या गाण्यावर अप्रतिम नृत्य सादर केले. यावेळी मान्यवरांनी व सर्व ग्रामस्थांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाला सरपंच गोपाळराव तौर, मुख्याध्यापक नानस्कर सर तसेच शिक्षिका सुरेखा कांबळे, शालेय समितीचे अध्यक्ष सतीश तौर, सोमेश्वर तौर, हनुमान तौर, गौतम तौर, गोटूराम तौर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामस्थ आणि पालक उपस्थित होते.

# मॉडेल इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ फेब्रुवारी**

सिंदफणा एज्युकेशन सोसायटी संचलित मॉडेल इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित नाटके आणि नृत्य सादर केले यामध्ये लावणी शेतकरी नृत्य पंजाबी नृत्य अशा कलाविष्कारांचा समावेश करण्यात आला होता. उद्घाटन पर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ एम.ए.कव्हळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुलजी सूर्यतळ

होत. मॉडेल इंग्लिश स्कूल ही सिंधफना एज्युकेशन सोसायटीची एक महत्त्वपूर्ण



शाखा असून सोसायटीचे अध्यक्ष माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, सचिव डॉ.आनंदगावकर , उत्तमराव प्रधान , बारटक्के, आर. एम. कांबळे सर, श्री जुनेद खान , श्रीमती अकोलकर , अभय भैय्या होके, प्रा.रामपूरकर, नितीन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे प्राचार्य बी. एम.जरे , पर्यवेक्षिका श्रीमती सुलभा मॅडम, सांस्कृतिक विभाग प्रमुख अमोल गायकवाड यांच्यासह उबेद खान,संदीप वाघमारे आणि शाळेचे इतर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्नेहसंमेलन यशस्वी पार पाडले. कार्यक्रमांमध्ये शाळेचा वार्षिक अहवाल शाळेचे प्राचार्य जरे यांनी सादर केला तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.मोमीन अरायना, सिद्दिकी सतिरा, सय्यद मारिया आणि शेख सजिया या विद्यार्थिनींनी केले. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी सिद्दिकी सतिरा व मोमीन अरायणा यांचाही सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

तरुण भारत

छोटे उस्ताद



## तुम्हाला माहिती आहे का?

- जर्मन मानसोपचारतज्ज्ञ हॅन्स बर्जर यांनी इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राम (ईईजी) या तंत्राचा शोध लावला.
- ईईजी हे मेंदूची विद्युत क्रीया मोजणारी वैद्यकीय चाचणी, मेंदूला समजून घेण्यासाठी आणि न्यूरोलॉजिकल विकारांचे निदान करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन आहे.

## अशी पाखरे येती


# आळशी 'डोडो'!

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

द्वीप, बेटावर शिकार करणारे कुणीच नाही, म्हणून बिनधास्त फिरायचं, आरामात रहायचं, उडण्याचं कसब असतानाही उडण्याची तसदी न घेता केवळ पडून रहायचं... इतकंच काय, नंतरच्या त्यांच्या पिढीही तशाच! खाणे-पिणे, रिकामटेकडे फिरणे आणि झोपणे! आळशी असतात लेकाचे! आळस माणसाच्या अथवा प्राणीपक्ष्यांच्याही कसा जीवावर उठतो, याचे जीवंत (?) उदाहरण म्हणजे डोडो हा सद्यस्थितीत नामशेष झालेला पक्षी! कधीकाळी हिंद महासागरातील मॉरिशस बेटावर आढळून येत असलेल्या, डोडो या पक्ष्याविषयी आपण बोलतोय. कबुतरांच्या जातीचा हा पक्षी मॉरिशस आणि हिंद महासागराच्या काही द्वीपांवर बऱ्याच वर्षांपूर्वी अस्तित्वात असल्याचे सांगण्यात येते. २३ किलो वजनाच्या डोडोला पंख असूनही उडता मात्र येत नव्हते. त्यामुळे, तो स्थलचर पक्षी होता. आत्मरक्षा करणे आणि शत्रूवर आक्रमण करणे, याचा पूर्णत: विसर पडल्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली. १७ व्या शतकात ही प्रजाती लुप्त झाली असली तरी, अनेक ठिकाणी तो दिसून आल्याचेही समजते. मनुष्यवस्ती नसलेल्या द्वीपांवर त्यांचे अस्तित्व असल्याने ते आळशी बनले असावेत. आरामदायी जीवन जगत राहिले. डोडो पक्ष्याला पंख असूनसुद्धा आणि पंखात क्षमता असूनसुद्धा उडण्याची आवश्यकताच पडत नसल्याने त्यांच्या पायांची हाडं दुबळी होत गेली. केवळ शरीराचा भार सांभाळण्याइतपतच त्यांच्या पायात जोर राहिला. दरम्यान, सोळाव्या शतकाच्या प्रारंभी मॉरिशसमध्ये डच लोकांनी पहिलं पाऊल ठेवलं. शिकारीसाठी जोरात धावायची गरज नाही, पाठलाग करावा लागत नाही, हे पाहून त्यांनी त्यांचे कुत्रे आणि खूप उंदीर या बेटावर आणून ठेवले. कुत्र्यांनी डोडोची शिकार करायला सुरुवात केली अन् उंदीर डोडोची अंडी खाऊ लागले. डोडो हे पक्षीही इतके आळशी की, कधीच स्वत:चं किंवा अंड्यांचं संरक्षण करायचा प्रयत्न केला नाही. जीव वाचवून पळून जाणे किंवा हल्ला करणे ते पूर्णत: विसरून गेले. परिणामी, पृथ्वीतलावरून डोडोची प्रजाती संपूर्णपणे विलुप्त झाली. असं म्हणतात की, पोर्तुगीजांनी १५०७ मध्ये डोडोला पाहण्यापूर्वी या पक्षांचा या बेटांवर हजारो वर्षांपासून अधिवास होता. या काळात त्यांना कोणी नैसर्गिक शत्रू नसल्यामुळे हा पक्षी आकाराने वाढत गेला आणि त्याची उडण्याची क्षमता मात्र नाहीशी झाली. दिसण्यात अतिशय बेढब असणाऱ्या डोडोची उंची एक मीटर असून वजन २०-२३ किलो, डोके मोठे आणि चोच २३ सेंमी लांब, काळी, भक्कम आणि टोकाला वाकलेली होती. रंग फिकट राखाडी किंवा निळसर राखाडी, पंख आखूड पांढरे-पिवळे होते. लहानशी शेपटी, आखूड पाय होते. माती व पालापाचोळा उकरत ते भक्ष्य शोधत. मुख्यत: फळे-बिया हे त्यांचे खाद्य होते. हे डोडो मासेही खात. भारतात वर्ष १६०० मध्ये दोन जिवंत डोडो आणल्याची नोंद आढळली आहे. डोडो पक्ष्याचे मांस अजिबात रुचकर किंवा लुसलुशीत नव्हते, असा उल्लेख असूनदेखील यांची शिकार एवढ्या मोठ्या प्रमाणात का झाली असावी? हा यक्षप्रश्न आहे.



## शब्दचक्र पंचाक्षरी





संकेत :–

1. राजाचा राणीवसा
2. जिम्मा, जोखीम, भार
3. पाण्यात बुडून मरण पत्करणे
4. पाण्यात पोहणे
5. शहरात येणाऱ्या मालावर स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा जकात आकारण्याचे ठिकाण
6. जमिनीत मिसळलेला, खाली पडलेला
7. पाणी भरलेल्या चिनी मातीच्या पेल्यांमधून सप्तस्वर काढणारे एक वाद्य
8 एका पौराणिक कथेनुसार सर्पयज्ञात 'तक्षकाय स्वाहा... इंद्राय स्वाहा' म्हणणारा राजा

(उत्तर पुढील अंकी)

## Solve the puzzle




मागील डोकं चालवाचे उत्तर :– 1. घरंदाज 2. साखेवर 3. घटसर्प 4. वारकरी – आपण शोधलेले नाव – घरोघरी मातीच्या चुली

## वंडर बॉय शाश्वत हरताळकर



संजय पेंडसे/९४२२४४३२९५

**बाल मित्रांनो,** हसतमुख चेहरा, हसवणारं व्यक्तिमत्व सगळ्यांबरोबर खेळीमेळीनं वागणं हे कोणाला आवडत नाही. आजचा आपला वंडर बॉय आहे शाश्वत हरताळकर! शाश्वतची आई शिक्षक सहकारी बँकेत आहे. अभिनयाची आवड असलेला, नृत्य शिकलेला नाही पण, टीव्हीवर माधुरी दीक्षित आणि ऋतिक रोशनचे नृत्य बघून घरीच आपल्या मनाने नृत्याचा सराव करणारा, ट्रॅव्हलिंगची आवड असलेला आणि हमखास रहस्यकथा वाचणारा वंडर बॉय शाश्वत नृत्य स्पर्धेकरीता नागपूर, मुंबई येथे आपलं नृत्य सादर करून बक्षीस मिळवले. वंडर बॉय शाश्वत सोमलवार खामला या शाळेत शिकतो.

त्यापूर्वी, काही वर्षे तो गुरुकुल शाळेमध्ये शिक्षणाचे धडे घेत होता. तिथल्या रूपाली या शिक्षिका त्याला खूप आवडतात. त्याचे मित्र आहेत आयान जोगदेव आणि वेद चांडक! शिक्षणाबरोबरच कला जोपासणारा आणि शिक्षणामध्ये ८०/८५ टक्के गुण मिळवणारा शाश्वत याने नाटकातही अनेक भूमिका केल्या. मुख्य म्हणजे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावरील महानाट्यात त्याने आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बालवयाची भूमिका हुबेहूब केली आणि प्रेक्षकांची प्रशंसा मिळवली. याशिवाय, 'माझा ज्ञानियांचा राजा', 'सियावर रामचंद्र की जय', 'भगवान परशुराम' अशा अनेक सादरीकरणातून भूमिका केल्या. शाश्वत कधीही भेटला तरी तो पहिल्या भेटीतच लोकांची मन जिंकतो, त्याच्या हसतमुख स्वभावामुळे! अशा हरहुन्नरी, लोकांची मन हमखास जिंकणाऱ्या शाश्वत या आपल्या आजच्या वंडर बॉयला तरुण भारतचा छोटे उस्ताद सलाम करतो आणि शुभेच्छा देतो.



## पळसफुला रे पळसफुला



पळसफुला रे पळसफुला,
पाहूनी मज का हसला
हवेच्या तालावरती,
खेळतोस का झुला

पळसफुला रे पळसफुला,
का झालास हिरमुसला
बागडणाऱ्या फुलपाखरांनी,
रंग मागीतलाका तुला

पळसफुला रे पळसफुला,
लाल केशरी किती झाला
देवबाप्पाने शेंदूर,
किती फासला अंगाला

पळसफुला रे पळसफुला,
मोहवितोस तू आम्हाला
दुःख सारं विसरूनी,
आनंद देतोस सर्वांना

**- रवींद्र चालीकवार**
- ९०११५५९१०६

# महिलांची सेवानिवृत्ती!



आरती दलाल-धारकर/८१७८५६९२५७

काय म्हणता? निवृत्ती आणि ती ही एखाद्या महिलेला? अशक्य! हो ना? खरंच आहे ते! आई किंवा एखादी गृहिणी कधी रिटायर होऊच शकत नाही. लग्नाच्या आधी वेगळ्या जबाबदाऱ्या आणि लग्नाच्यानंतर वेगळ्या जबाबदाऱ्यांनी ती सतत कामात मग्न असते किंबहुना, तिला कधी तिच्यासाठी वेळ काढताच येत नाही. घरातील कामं आटोपून, नवऱ्यासाठी, सासू-सासऱ्यांसाठी, मुलांसाठी आणि नातेवाईकांसाठी वेळ देताना ती पार दमून जाते. त्यात नोकरी असली तर, विचारायलाच सोय नाही. घरचे म्हणतात, तू आम्हाला वेळ देत नाही आणि ऑफिसमधल्यांना वाटतं की, किती सुट्या घेते ही बाई? अशी कोणती कामं असतात या बायकांना? खरंय ना? खरंच संसाराचं जातं एकदा सुरू झालं की, ते आपण संपेपर्यंत काही थांबत नाही. हो, पण यात काही स्टेशन्स मात्र येतात. हो काही स्पिडब्रेकर्स असतात. काही मोठे पॉज घ्यावे लागतात. जेव्हा मुलं मोठी होऊन आपापल्या कामाला लागतात. त्यांचं स्वत:चं जग निर्माण होतं तेव्हा मात्र, आईच्या वाट्याला रिकामपण येतं. तेव्हा वाटतं, आपली सारी धावपळ थांबली आहे आणि त्यावेळी करण्यासारखं काहीच नसतं. करण्यासारख्या कितीतरी गोष्टी आपण मागे सोडून आलेलो असतो आणि आता या वयात काही नव्याने सुरू करण्याची उमेदही नसते आणि तेवढा आत्मविश्वासही नसतो. पुन्हा कोण काय म्हणेल? हे शेपूटही मागे असतंच की!

> पन्नाशीनंतरच्या वयाच्या टप्प्यात काय करावं? हे अनेकदा सुचत नाही. मुलं मोठी झालेली असतात. त्यांच्या मागची धावपळ आता थांबलेली असते. त्यांचं जग आता ते जगत असतात. कधीकाळी, आई तुला आमच्यासाठी वेळच नाही, असं म्हणणाऱ्या आपल्या मुलांनाच आता आपल्यासाठी वेळ नसतो. जोडीदार त्याच्या जगात असतो. त्याला आपल्या एकटेपणाची तेवढी जाणीव छळत नाही. नोकरी करणारी स्त्री असली तर, रिटायरमेंटनंतर नक्की काय करावं ते सुचत नाही. कारण, नोकरीच्या निमित्ताने सतत घराच्या बाहेर रहाणं होतं. रिटायर झाल्यामुळे अचानक आलेला एकटेपणा छळतो आणि सोबतच नोकरीत असल्याने शेजारी पाजारी जाऊन गप्पा मारत बसायला कधी वेळच मिळाला नसतो. त्यामुळे, आता तसे काही करणेही झेपण्यासारखे नसते.

पन्नाशीनंतरच्या वयाच्या टप्प्यात काय करावं? हे अनेकदा सुचत नाही. मुलं मोठी झालेली असतात. त्यांच्या मागची धावपळ आता थांबलेली असते. त्यांचं जग आता ते जगत असतात. कधीकाळी, आई तुला आमच्यासाठी वेळच नाही, असं म्हणणाऱ्या आपल्या मुलांनाच आता आपल्यासाठी वेळ नसतो. जोडीदार त्याच्या जगात असतो. त्याला आपल्या एकटेपणाची तेवढी जाणीव छळत नाही. नोकरी करणारी स्त्री असली तर, रिटायरमेंटनंतर नक्की काय करावं ते सुचत नाही. कारण, नोकरीच्या निमित्ताने सतत घराच्या बाहेर रहाणं होतं. रिटायर झाल्यामुळे अचानक आलेला एकटेपणा छळतो आणि सोबतच नोकरीत असल्याने शेजारी पाजारी जाऊन गप्पा मारत बसायला कधी वेळच मिळाला नसतो. त्यामुळे, आता तसे काही करणेही झेपण्यासारखे नसते. आता अचानक आलेलं रिकामपण खायला उठतं. जोडीदाराने आपल्याला वेळ दिला तर ठिकच आहे. पण, नाही दिला तर? त्यामुळे नोकरीवर असतानाच, रिटायरमेंटनंतर काय करावं किंवा मुलं मोठी झाल्यावर आपल्या रिकाम्या वेळेचं काय करावं, याच प्लॅनिंग महिलांनी करून ठेवायला हवं. सांगताना चांगलं वाटतं पण, प्रत्यक्षात ते किती शक्य आहे? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल ना!

मुलं मोठी होण्याच्या उंबरठ्यावर असताना, आपणच आपल्यासाठी थोडा वेळ काढून आपल्या नंतरच्या रिकाम्या वेळात काय करू शकतो? याचा विचार करून ठेवायला हवा. नव्हे, तसे प्लॅनिंगच करायला हवे. उतारवयात फिरायला जाणे कितपत जमेल याचा अंदज नसतो. त्यामुळे, मधल्या काळातच वेळ काढून थोडे थोडे फिरून घ्यावे. आजकाल महिलांच्या खूप सहली ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून अरेंज होतात. त्यामुळे, अशा कंपन्यांसोबत सहलीला जाण्याचा प्लॅन हा मस्त असतो. तिथे आपल्याला नवीन मैत्रिणी पण मिळतात आणि आपला विरंगुळाही होतो.

आपल्या आताच्या वेळातून थोडा वेळ काढून, आतापासूनच आपला एखादा छंद जोपासावा. गाणे म्हणणे, ऐकणे किंवा पुस्तक वाचणे, एखादे वाद्य शिकणे यासारखा आपला, आपल्यापुरता पुरेल असा एखादा छंद जोपासावा. वेळ मिळेल तेव्हा शिकायला जावे आणि आजकाल गाण्याचे, वादनाचे अनेक ग्रुप आहेत. ते जॉईन करून स्वत:चा वेळ सत्कारणी लावावा. अनेकदा आपल्याला नवीन काही सुरू करण्याचा आत्मविश्वास नसतो. पण, जे जे आपल्या उमेदीच्या काळात राहून गेले ना, त्याची एक यादीच करावी आणि त्यानुसार जे जे शक्य होईल ते सारे जगून घ्यावे. साऱ्यांनाच ते मनासारखं जगता येईल, असं नाही. किंबहुना ९० टक्के लोकांना ते कॉम्प्रमाईज करतच जगावं लागतं. त्यामुळे, किमान जेव्हा शक्य होईल तेव्हा आपणच मनासारखं जगून घ्यावं. जुन्या मैत्रिणींना कॉल करून, मनमोकळ्या गप्पा माराव्यात. पण, एकदम रिकामपण आल्यावर आता मी काय करू? हा विचार करत बसण्यापेक्षा पूर्वीपासूनच त्यासाठी थोडी तयारी करायला सुरुवात करावी. चला तर मग लागू या कामाला...

## तरुण भारतचा अभिनव उपक्रम ज्ञानांजली!



**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू करीत आहोत. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. ब्रह्माण्डनायक सद्गुरुंच्या प्रगटदिनाचं औचित्य साधून, आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा.

### प्रश्नसंच - १

**१) अंगी साधुत्व येण्यासाठी काय धुतले पाहिजे ?**
अ) अहंकार ब)षड्विकार क) शरीर ड) कपडे

**२) बाळापुरातील दोन निस्सीम भक्त कोण होते ?**
अ) सुकलाल व बाळकृष्ण ब) सुकलाल व पितांबर
क) बाळकृष्ण व भास्कर ड) सुकलाल व गोसावी

**३) द्वाड लोकांना सुधारण्यास ईशाज्ञेने कोण भूमीवर अवतार घेतात ?**
अ) राक्षस ब) गंधर्व क) साधुपुरूष ड) मनुष्य

**४) श्री शंकराचार्य, गोरख, जालंधर यांचा भक्ती करण्याचा मार्ग कोणता ?**
अ)भक्तिमार्ग ब) योगमार्ग क) कर्ममार्ग ड) ज्ञानमार्ग

**५) सदाशिव वानवळे यांचे टोपण नाव काय?**
अ) बंडू ब) बापू क) आप्पा ड) तात्या

**६) काळ्या रामाच्या मंदिराच्या दारात कोण बसले होते ?**
अ) महंत गोपाळदास ब) महंत गिरी क) महंत मच्छिंद्र ड) महंत गहनी

**७) महाराजांनी माधव विप्राला मृत्यू जवळ आला असता कोणते भजन करावयास सांगितले ?**
अ) विठ्ठल विठ्ठल ब) श्रीमन्नारायण नारायण क) हरे राम ड) हरे कृष्ण

**८) गणेश आप्पांच्या पत्नीचे नाव काय होते ?**
अ) भागाबाई ब) जानकीबाई क) लक्ष्मीबाई ड) चंद्राबाई

**९) सर्वप्रथम महाराज प्रगट झाल्यानंतर कोणाशी बोलले ?**
अ) बंकटलाल व पितांबर ब) दामोदरपंत व बंकटलाल
क) पितांबर व दामोदरपंत ड) बंकटलाल व भवानीराम

**१०) 'ज्ञाननभी जो दिनकर' असे दासगणू महाराजांनी कोणाला म्हटले ?**
अ) गजानन महाराज ब) माधवाचार्य क) शंकराचार्य ड) वासुदेवानंद

# बंटीची बंडखोरी

(भाग ४१)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२



'बंटी, आपल्या परीक्षेच्या तारखा अजून जाहीर झाल्या नाहीत. तुला काही कळलं का?' यशनं विचारलं. 'फेब्रुवारीतच प्रॅक्टिकल आहेत आणि थिअरीचे पेपर्स मार्चच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यात आहेत, असा अंदाज आहे. म्हणजे आई सांगत होती. केव्हा का येईनात, आपली अगदी जय्यत तयारी आहे. त्यामुळे घाबरायचं काही कारण नाही,' बंटी बोलला.

'खरंच बंटी, तुझ्यामुळे आमचाही अभ्यास, एकदम परफेक्ट झालाय. टेस्ट सीरीज, इतर पेपर्स, तुझ्या आईनं दिलेले पेपर्स... इतके पेपर्स सोडवून झालेत नं की, बोर्डच्या परीक्षेचं काही टेन्शनच वाटत नाहीये,' शिरीषनं सांगितलं. 'हो नं बंटी...आमचीसुद्धा अशीच स्थिती आहे,' स्वानंदनं पुष्टी जोडली. युग, चंदू, नंदूनं त्याच्या होकारात होकार मिसळला.

'म्हणून तर आपल्या इतर ॲक्टिव्हिटीज व्यवस्थित चालू असतात. दोस्तांनो, या १९ तारखेला म्हणजे बुधवारी, छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती आहे. आपण दरवर्षीप्रमाणे या वर्षीही साजरी करायची आहे. कोणाला काही आयडिया सुचतेय का?' बंटीनं विचारलं. 'जयंती म्हणजे जन्मदिवस...मग शिवनेरी गडाची प्रतिकृती करू या! शिवनेरीवरच महाराजांचा जन्म झाला. त्यामुळे आनंदोत्सव करू या! आपल्यासाठी अतिशय महत्वाचा दिवस आहे हा,' शिरीषनं सुचवलं.

'अगदी बरोबर बोललास शिरीष, छान कल्पना! शिवनेरीची प्रतिकृती! पण, यावेळी आपण आपल्या सोसायटीच्या बाळगोपाळांकडून करवून घेऊन किल्ला! आपले दादा लोक त्यांना मदत करतील कारण, आपल्याला इतका वेळ देणं शक्य होणार नाही,' बंटीनं सांगितलं.

'हो, चालेल...चालेल!' बंटी ग्रुप एका सुरात ओरडला. 'आपल्या सोसायटीत सगळीकडे भगव्या पताका लावू. मेन गेटवर फुलांचे तोरण लावू या. वाजंत्री, सनई-चौघड्याचं रेकॉर्डिंग लावू. सगळ्यांचं अत्तरगुलाब देऊन स्वागत करू. पोवाडे लावू या,' बंटी म्हणाला. 'पेढेसुद्धा वाटू या,' यश म्हणाला. 'अर्थात! सेक्रेटरी काकांना आपल्या कल्पना सांगू. त्याप्रमाणे, कोणाकोणावर काय काय कामं सोपवायची, हे त्यांनाच ठरवायला सांगू,' बंटीनं सांगितलं. 'बंटी, कोणाला तरी अध्यक्ष म्हणून बोलवायला लागेल. जसं २६ जानेवारीला स्वातंत्र्य सैनिकांना बोलावलं होतं तसं आता कारगिल युद्धात सहभागी झालेल्या एखाद्या आर्मी ऑफिसरला बोलवावं असं मला वाटतं,' बंटीचे बाबा जेवणासाठी खुर्चीवर बसता बसता म्हणाले.

'हो, बंटी! बाबांचं म्हणणं बरोबर आहे कारण, छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंतीला रणांगणावर शौर्य गाजवणाऱ्या एखाद्या सैनिकाला बोलावणं, योग्य होईल,' जेवणाची ताटं मांडताना आई म्हणाली. 'हो नं, छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी त्यांच्या युद्धात जसा गनिमी कावा वापरला, तसाच आपल्या योद्ध्यांनाही 'गोरिला वॉरफेअर' म्हणजे गनिमी कावा वापरून, शत्रूवर विजय मिळवावा लागतो,' बाबा म्हणाले. 'आई-बाबा... महाराजांनी आणि त्यांच्या मावळ्यांनी, जशी रोहिडेश्वराच्या देवळात, महादेवाच्या पिंडीला करंगळी कापून, रक्ताचा अभिषेक केला आणि स्वराज्याची शपथ घेतली, तशीच आपल्या सैनिकांना, सैनिकी शिक्षण घेऊन प्रत्यक्ष सैन्यात भरती होताना घ्यावी लागते. अविमामा सांगत होता,' बंटीनं सांगितलं.

सोसायटीच्या सेक्रेटरींना, बंटी ग्रुपची कल्पना खूपच आवडली. मात्र, दहावीची परीक्षा जवळ आल्यामुळे बंटी ग्रुप नेहेमीप्रमाणे सक्रीय राहणार नाही, याचंही वाईट वाटलं. दादा ग्रुपनं उत्साह दाखवला आणि बच्चे ग्रुपनं त्यांच्या हाताखाली काम करायची तयारी दाखवली. जोशी आजोबा आणि देशपांडे आजोबांची जोडगोळी मार्गदर्शन करायला तत्पर होतीच.

'बाबा, तुमचे मित्र कर्नल सरंजामे काका कारगिलच्या युद्धात सहभागी होते का? आपण त्यांच्या शेतावर गेलो होतो ते?' बंटीनं विचारलं. 'हो...होते ते कारगिल युद्धात! त्यांनी केलेल्या पराक्रमाबद्दल त्यांना शौर्य पदकही मिळालं होतं. त्यांनाच बोलवू या अध्यक्ष म्हणून,' बाबा म्हणाले. सोसायटीच्या क्लब हाऊसच्या नोटीस बोर्डावर 'छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती' उत्सवाची नोटीस लागली. चैतन्य, उत्साहाचे वारे वाहू लागले. इंजिनिअरिंगला असलेल्या दादांनी प्लायवुडच्या तुकड्यांमधून शिवनेरी किल्ला बनवायला सुरूवात केली.

'मित्रांनो, एकदम प्लायवुड कापण्याऐवजी प्रथम, पुठ्ठ्याची कापाकापी करून, शिवनेरीचं मॉडेल बनवून घ्या. स्टेपलरने पिना मारून तात्पुरता किल्ला तयार करा. त्यात फेरबदल करून, मग प्लायवुडचा पक्का किल्ला करा,' बंटीच्या बाबांनी दादा लोकांना सल्ला दिला. बच्चे कंपनीने किल्ल्याचा बेस म्हणजे मातीचा डोंगर उभारला. त्यावर गहू-धणे पेरून गव्हाचे कोंब आणि धण्याची कोथिंबीर उगवली. वॉचमन काकांनी भगव्या पताका बनवल्या. संपूर्ण सोसायटीत आकर्षक रीतीने त्यांची सजावट केली. ताई कंपनीने कागदी फुलांचं भलं मोठं तोरण तयार करून मेन गेटच्या कमानीवर लावलं. बाबा लोकांनी, महाराजांच्या जन्माच्या प्रसंगाचे पोवाडे यू ट्युबवरून शोधून काढले आणि पेन ड्राईव्हमध्ये सेव्ह केले.

'बंटी, यार... सोसायटीत छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवाची नुस्ती धूम चालली आहे आणि आपण त्यात भाग घेऊ शकत नाही. चांगलं वाटतं का?' शिरीषच्या बोलण्यातून खेद व्यक्त होत होता. 'धीर धरा मित्रांनो, आपण आत्ता जास्तीत जास्त पेपर्स सोडवू. मग प्रत्यक्ष उत्सवाच्या वेळी, संपूर्ण दिवस आपण फ्री राहू. जेवढा अभ्यास करायचा, तेवढा करू. मग बुधवारी, कोणीही अभ्यास-पेपर्सचं नाव सुद्धा तोंडातून घ्यायचं नाही. कबूल?' बंटीनं साऱ्यांना समजावून सांगितल्यावर कुठे राग कमी झाला सगळ्यांचा!

बघता बघता १९ फेब्रुवारीचा बुधवार उजाडला. दादांनी केलेला शिवनेरी किल्ला, मातीच्या डोंगरावर दिमाखात उभा राहिला. तटबंदी, बुरूज सारं हुबेहूब जमलं होतं. 'बंटी, अरे किल्ल उभा राहिला पण त्यावर चित्रं नाही ठेवली,' यश म्हणाला. 'सायंतारामधल्या स्वप्नीलकडे आहेत चित्रं, मागच्या वर्षीची! चला आणू या त्याच्याकडून,' बंटी ग्रुपला घेऊन निघाला. स्वप्नीलनं त्याच्याकडची ढिगभर चित्रं दिली. 'अरे, महाराजांचं खेळणं नको. कारण, आज त्यांचा जन्मदिन आहे नं? बाकी मावळे, गवळणी, वाघ, सिंह चालतील.' बंटीनं बरीचशी चित्रं काढून ठेवली. चित्रं मांडल्यावर किल्ल्याला शोभा आली. सनईचौघडे वाजू लागले. तायांनी सुरेख रांगोळ्या काढून त्यात रंग भरले. प्रत्येकाला अत्तर गुलाब लावल्यानं, वातावरणात मांगल्य आलं, प्रसन्नता आली. दादा, बंटी ग्रुप, बाबा ग्रुप, आजोबा ग्रुप साऱ्यांनी कुडते-पैजामे घालून, भगवे फेटे बांधले. यात बच्चेकंपनीसुद्धा मागे नव्हती. ताई, काकू, आजींनी नऊवारी लुगडी, नथ असा पेहेराव केला.

कर्नल सरंजामे बरोबर वेळेवर आले. डिफेन्समधे असल्याने वेळेचं महत्व ते जाणत होते. प्रथम, शिवनेरीवर महाराजांचा जन्मोत्सव साजरा झाला. कोणी कोणी पाळणेही म्हटले. सर्वांना पेढे वाटून टाळ्यांचा कडकडाट झाला. साऱ्याचं व्हिडिओ शूटिंगही घेण्यात आलं. क्लब हाऊसमध्ये कर्नल साहेबांचं भाषण झालं. आपल्या जोशपूर्ण भाषणात, त्यांनी युद्धप्रसंगी आलेली संकटं, अडचणी, त्यावर केलेली मात, छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या पराक्रमांची गाथा, औरंगझेब, अफजलखान, शाहिस्तेखान साऱ्यांना नेस्तनाबूत करून, महाराजांनी केलेली स्वराज्याची स्थापना यांचंच वर्णन केलं.

त्यांच्या भाषणानं, साऱ्यांना स्फुरण चढलं. 'हर हर महादेव' चा नारा दिला.

दिवसभर पोवाडे वाजत राहिले. वर्तमानपत्रं, काही न्यूज चॅनेल्सनेही बंटीच्या उपक्रमाची दखल घेतली. इन्द्रप्रस्थचे सभासद धन्य झाले.

क्रमशः

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य पदयात्रा









**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाच्या निर्देशानुसार हिंगोली जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या जय शिवाजी, जय भारत पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून पदयात्रेला सुरुवात करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरु झालेल्या या पदयात्रेत विद्यार्थी, अधिकारी-कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या तालावर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने केलेल्या सादरीकरणाने यावेळी उपस्थितांची मने जिंकली. तसेच यावेळी जय भवानी, जय शिवाजी या घोषणेने सर्व परिसर दुमदुमून गेला.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके, समाज कल्याणचे सहायक आयुक्त यादव गायकवाड, नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी आशिष पंत, हिंगोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच जिल्हा उत्सव समितीचे अध्यक्ष अॅड उल्हास पाटील, कार्याध्यक्ष बिरजू यादव, सचिव सागर पाटील, कल्याण देशमुख यावेळी उपस्थित होते.

'जय शिवाजी, जय भारत' पदयात्रेमध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत जवळपास दीड ते दोन हजार विद्यार्थी, नागरिक यांच्यासह अधिकारी, कर्मचारी या पदयात्रेत सहभागी झाले होते. यामध्ये अनेक विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मावळे, वारकरी आदी पारंपारिक वेशभूषा केल्या होत्या. यावेळी ढोल-ताशांच्या गजरात विविध शाळा, महाविद्यालयांच्या लेझीम, झांज पथकांचे सादरीकरण सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या सळसळत्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पदयात्रेला सुरुवात झाली. अश्वारूढ झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेतील विद्यार्थी आणि चित्ररथ या पदयात्रेच्या अग्रस्थानी होते.

ही पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पोस्ट ऑफिस, महात्मा गांधी चौक, महावीर चौक, इंदिरा गांधी चौक मार्गे परत छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे आल्यानंतर पदयात्रेचा समारोप करण्यात आला. जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह सर्व उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

पदयात्रेपूर्वी शासकीय विश्रामगृह परिसरात आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच नगर परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते एक पेड नाम अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. तसेच यावेळी आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी जय शिवाजी, जय भारत पदयात्रेत युवा वर्गाने मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करून छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

या पदयात्रेत घोडदळ, माजी सैनिक, शिवशंभो ढोलपथक, महिला, बंजारा नृत्य (महिला), शिवरथ, वारकरी भजनी मंडळ, लेझीम पथक, शाळकरी मुले देखावा, नगरपालिका चित्ररथ, लाठी काठी, एनसीसी पथक, शासकीय विविध योजनेचे देखावे, कौशल्य विकास विभागाचे कौशल्य रथ, बँड पथके सहभागी झाली होती.

# दास नवमीनिमित्त हिंगोलीहून पालखी साखरखेर्डाकडे रवाना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**

श्रीक्षेत्र साखरखेर्डा येथील दासनवमी १९ फेब्रुवारीला सकाळी हिंगोली येथील मंगळवार बाजार भागाचे दत्त मंदिरातून पालखीचे प्रस्थान झाले आहे.

देऊळगाव रामा येथे अॅड अनंत पांडे यांच्या तर्फे प्रसादाची व्यवस्था केली होती. नर्सी नामदेव येथे पालखीचा मुक्काम ढवळे यांच्याकडे झाला. या पालखीमध्ये धनंजय मेथेकर, सौ धनश्री मेथेकर, राजुगुरू शुक्ला, सौ दीपाली शुक्ला, सर्वेश शुक्ला, आकाश लोहगावकर, मल्हार मेथेकर, चैतन्य देशपांडे, शिवाजी दिवाळकर, खंडेराव मेथेकर, सौ उषा देशमुख, तेजस रत्नपारखी, मनोज दिवाळकर, सखाराम शार्दूल, रेखाताई भरकर, अशोक अण्णा चाटे, प्रकाश मेथेकर, सौ पूजा मेथेकर आदी भाविकांचा समावेश आहे. २० फेब्रुवारीला नर्सी ना. येथून पालखीचे प्रस्थान होऊन रिधोरा येथील श्री गजानन महाराज मंदिरात दुपारी पोहचणार तर सेनगावातील साई मंदिर श्री शाम गुरुयांच्याकडे मुक्कामी राहणार आहे. २१ फेब्रुवारीला कोळसा कृषि केंद्र येथे सकाळी प्रस्थान होऊन दुपारी पानकनेरगाव येथे श्री दत्तराव शिंदे आणि रात्रीला उपासना मंडळ गणपती मंदिर रिसोड २२ फेब्रुवारीला श्री गणपती मंदिर मोठेगाव, दुपारी श्री विष्णू डहालके एकलासपूर, तर रात्री श्री चैतन्य आळशी सोनाटी येथे मुक्काम २३ फेब्रुवारीला २३८ श्री रेणुकामाता मंदिर उकळी सुकळी, दुपारी मेहकर बालाजी सस्थान देशमुख तर श्री पाडुरंग संस्थान देऊळगाव माळी येथे मुक्काम आणि २४ फेब्रुवारीला गाढवे वरोडी येथून गो. रा. स. स श्री प्रल्हाद महाराज संस्थान साखरखेर्डा येथे पोहचणार आहे.



**हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त येथील शासकीय विश्रामगृह परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यासमोर महिलांनी दिपोत्सव साजरा केला. यावेळी शेकडो दिव्यांनी पूतळा परिसर तेजोमय आणि आकर्षक दिसत होता. छाया- विजय गुंडेकर**



हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करतांना जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, समितीचे अध्यक्ष अॅड उल्हास पाटील, पोनि नरेंद्र पाडळकर आदी. छाया- विजय गुंडेकर



हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातून भव्य पदयात्रा काढण्यात आली होती. या पदयात्रेत वारकरी सांप्रदायाचे भजनी मंडळात आ. तान्हाजीराव मुटकुळे, रामराव वडकुते यांनी सहभाग घेतला होता.



हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या भव्य पदयात्रेत शिवशंभो बँड पथकातील महिला आणि मुलींनी उत्कृष्ट वादन केले. हे पथक नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. छाया- सुनील पाठक



हिंगोली- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात शेकडो तरूणांनी रक्तदान करीत आपला सहभाग नोंदवला. छाया- विजय गुंडेकर

# कळमनुरीत सार्वजनिक शिवजयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**कळमनुरी, १९ फेब्रुवारी**

येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठा उत्साहात ढोल ताशांच्या गजरात पारंपारिक वाद्य वाजवत, टाळ, मृदुंग, विना, चिमुकल्यांचे लेझीम पथक, यासह शिवाजी महाराजांचा देखावा व मावळे मा जिजाऊ मासाहेब यांचा देखावा घोडदळ, सैनिक शाळेचे जवान यांचा आकर्षक देखावा या मिरवणुकीमध्ये करण्यात आला होता यावेळी वीर शौर्य वारकरी शिक्षण संस्था तोटलिंग स्वामी मठ, आत्मज विद्यामंदिर, स्व.शिवरामजी मोघे विद्यालय सैनिक शाळा, इच्छापूर्ती ढोल पथक आखाडा बाळापूर, घोडदळ १० घोडे या मिरवणुकीमध्ये सहभागी होते यामध्ये हजारोंच्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते. ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढत मोठा मारोती मंदिर शहरातील मिरवणूक मार्गावरून ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज अर्धाआकृती पुतळा नगरपरिषद कार्यालय येथे संपन्न झाली छत्रपती शिवाजी महाराजांचे आकर्षक देखावे व पुतळ्याची सजावट करत ही मिरवणूक साजरी करण्यात आली. यावेळी सार्वजनिक शिवजयंती समितीचे बबलू पत्की, शैलेश उबाळे, हरीश भोसले, योगेश संगेकर, आशिष वाघ, शिवराम गायकवाड, स्वप्निल पतंगे, नितीन बेद्रे पाटील, गजानन पाध्ये, गोपाल काकडे, गोविंद बेद्रे, विश्वनाथ बोराळे सावंत तोष्णीवाल, कैलास नाईक, सुरज शिंदे, अॅड मनोज देशमुख, शिवराज पाटील, यांच्यासह अनेक शिवभक्तांची उपस्थिती होती. या मिरवणुकीसाठी कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोष बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख राम कदम, माजी आमदार गजाननराव घुगे, माजी आमदार संतोष टारफे ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख गोपू पाटील सावंत यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करीत मिरवणुकीत सहभाग नोंदवला.

# विविध शाळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन







**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ फेब्रुवारी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध शाळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करीत उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली.

शहरातील एबीएम इंग्लिश हायस्कूलमध्ये शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, मुख्याध्यापक जोसेफ के जे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्याची पूजन करून व दीप प्रज्वलन करून झाले. याप्रसंगी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मावळा, मासाहेब जिजाऊ, यांची वेशभूषा परिधान केली होती व शाळेला अत्यंत शिवकालीन स्वरूप आल्याचे दिसून आले यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी भाषण दिली. अनेक विद्यार्थ्यांनी पोवाडे गायले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे वेगवेगळे विचारही प्रकट केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याभिषेकाचेही वर्णन नाटिकेतून प्रस्तुत केले. शाळेचे शिक्षक नितीन शिंदे यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांवर भाषण दिले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचा हेड बॉय श्रीविनायक कापसे व हेड गर्ल प्रांजल आहेर यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे शिक्षक आदेश बोराळकर यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या शिक्षिका शेख उजमा नायाब, संदीप जोंधळे, जिथिन पी एस, आदेश बोराळकर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अशा सर्वांनी अत्यंत मोलाचे सहकार्य केले व हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.

यानंतर, छत्रपती शिवाजी महाराज अत्यंत धैर्यशील आणि उत्कृष्ट नेतृत्व गुण असणारे राजे होते. त्यांनी मातृभूमीच्या सेवेसाठी रक्त सांडले आणि तनामनाने अखंड हिंदवी स्वराज्यासाठी झुंजणारा जगातील एकमेव राजा म्हणून ओळखले जातात. या विषयावर काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्कार मोरे, प्रिशा इंगोले, अपूर्वा पवार, अनुश्री मगरे (णघत्रऋ), श्रीनिधी कल्याणकर, श्रुती जोंधळे, अनुष्का देशमुख, अनुश्री धुमाळ, आराध्या कदम, अक्षरा केळगेंद्रे, प्रथमेश देशमुख, आरोह सुंधाळे, आसावरी गायकवाड, गौरी हाळीकर, मयुरेश गायकवाड, श्रद्धा वाघमारे, निरज सारंगिरे, अलका कुटेकर यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सौ पुष्पा सुनील राठोड, विपुल राठोड, सौ रेश्मा विपुल राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकूल राठोड व शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेकाले आणि सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले.

सेनगाव तालुक्यातील पळशी येथे रुक्मिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव वाठोरे तसेच संस्थेचे सचिव स्वप्निल वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक व प्राचार्य पी. के.तावरे, पर्यवेक्षक मोरे, शिक्षक पवार, चापके, गीते, ढवळे, घेवंडे, वाठोरे, शिखरे, कोटकर, गांधिले, खंदारे, बहीरे, घोगडे, ढोले, थोरात, लोणे, इंगोले, गावंडे, लोणकर, दवंडे ,काळबांडे, खिल्लारी, शिखरे, पोहकर, सतिष तावरे, संदिप तावरे, डोंगरे आदेश शिंदे, खाटोकर, साई पवार, बालाजी दिवाने- आदींची उपस्थिती होती.